एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर....
इंडियन कस्तुरी
फ्लारिश फ्रॅग्रनस् कं. ची प्रिमियम मसाला अगरबत्ती
५० व २५० ग्रॅम बॉक्स पॅकिंग मध्ये उपलब्ध
Indian Kasturi
तसेच केशरचंदन,शाहीऊद,हिना कस्तुरी, महालक्ष्मी, कस्तुरीचंदन अगरबत्ती व धुप
शुभलाभ(६ ईन १ पाऊच रु.६० चा ५० मध्ये)
कापुर, शेंदूर,अत्तर,धुप,व वजनावर सुटी अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
आडते बाजार,अहिल्यानगर.
सुवासीक पुजाकीट, गिफ्टसह सवलतीत उपलब्ध
स्कीम ३१ ऑगस्ट २५ पर्यंत उपलब्ध


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ३०.०७.२०२५ | अंक नं. १०३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
३० ते ७०% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सोन्याची राखी ₹ 777/- पासुन
चांदीची राखी ₹ 199/- पासुन
चांदीमधील 1000 पेक्षा अधिक डिझाईन उपलब्ध
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# अहिल्यानगरमधील बनावट नोटांचे मराठवाडा कनेक्शन समोर; बीडमधून एकाला तर छत्रपती संभाजीनगरमधून दोघांना पकडले

नगर – भारतीय चलनाच्या ५०० रुपयांच्या हुबेहूब बनावट नोटा छापून त्या चलनात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघा तरुणांना नगर तालुका पोलिसांच्या पथकाने रुईछत्तीसी गावच्या शिवारात २७ जुलै रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास पकडले होते. त्यांच्याकडून बनावट नोटा, महिंद्रा कंपनीच्या थार गाडीसह सुमारे १७ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. या नोटांचे मराठवाडा कनेक्शन असल्याचे तपासात समोर आले आहे. पकडलेल्या दोघांना बनावट नोटा पुरवणारा बीड जिल्ह्यातील एक आणि छत्रपती संभाजीनगरमधील दोघांना पोलिसांनी पकडले आहे.

पोलिसांनी सोमनाथ माणिक शिंदे (वय २५, रा. तपोवन रोड, नगर) व निखील शिवाजी गांगर्डे (वय २७, रा. कोंभळी, ता. कर्जत) या दोघांना पकडले होते. त्यांना या नोटा प्रदीप संजय कापरे (रा.शिरूर कासार, जि. बीड) याने पुरवल्या असल्याची माहिती या दोघांनी दिल्यानंतर पोलिसांनी त्यालाही अटक केली आहे. या तिघांपैकी सोमनाथ शिंदे याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आलेली आहे. तर निखील गांगर्डे याला ३० जुलैपर्यंत आणि प्रदीप कापरे यास १ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. प्रदीप कापरेकडून मिळालेल्या माहितीवरून या बनावट नोटांच्या रॅकेटमध्ये आणखी दोघांची नावे समोर आली. त्यानंतर पोलिसांनी मंगेश पंढरी शिरसाट (वय ४१, रा. शिवाजीनगर, जि. छत्रपती संभाजीनगर) व विनोद दामोदर अरबट (वय ५३, रा. सातारा परिसर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांना स.पो.नि. प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली थोरात, सोनटक्के, विक्रांत भालसिंग, राजू खेडकर, बाबा खेडकर सागर मिसाळ, शरद वांढेकर यांच्या पथकाने ३० जुलै रोजी पकडले आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील आरोपींची संख्या ५ झाली आहे.

नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते यांना गोपनीय माहिती मिळाली की, रुईछत्तीसी परिसरात २ इसम एका महिंद्रा थार गाडीत भारतीय चलनातील ५०० रुपयांच्या बनावट नोटा घेवून त्या खऱ्या असल्याचे भासवून व्यवहार करण्यासाठी येत आहेत. ही माहिती मिळताच त्यांनी रात्र गस्त पथकाला बोलावून घेत पथकासोबत ते रुईछत्तीसी गावच्या शिवारात २७ जुलै रात्री १० वाजण्याच्या सुमारास जावून सापळा लावून थांबले. काही वेळातच संशयित थार गाडी (क्र. एम एच १६ डी एल २७९७) त्यांना येताना दिसली. पोलिसांनी ती गाडी थांबविली असता त्यात सोमनाथ शिंदे व निखील गांगर्डे हे बसलेले दिसले.

पोलिसांनी पंचांच्या समक्ष त्यांची झडती घेतली असता सोमनाथ शिंदे याच्या खिशात ५०० रुपयांच्या १०० बनावट नोटा आढळल्या. तर निखील गांगर्डे याच्या खिशात ५०० रुपयांच्या ६० बनावट नोटा आढळल्या. त्या चलनात आल्या असत्या तर त्यांचे मूल्य ८० हजार एवढे झाले असते. पोलिसांनी त्या बनावट नोटा, दोघांकडील मोबाईल सोमनाथ शिंदे याच्या खिशातील १०, २०, ५०, १००, २०० रुपयांच्या २ हजार ८७० रुपये किंमतीच्या खऱ्या नोटा, थार गाडी असा १७ लाख ३७ हजार ८७० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून दोघांना ताब्यात घेत अटक केलेली आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक भरत धुमाळ हे करत असून या प्रकरणात अजून कोणाचा सहभाग आहे, त्यांनी बनावट नोटा कुठे छापल्या याचा शोध पोलिस घेत आहेत.

SONi TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

## बैलगाडा शर्यत पाहायला गेलेल्या इसमाचा बैलाच्या धडकेने मृत्यू


संजय जाधव (मयत)

नगर – भिंगार येथील मोरे मळा परिसरात विनापरवाना आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीत एक बैलगाडा, शर्यतीचा मार्ग भरकटल्याने प्रेक्षकांमध्ये घुसला आणि झालेल्या अपघातात संजय आसाराम जाधव (वय ५५, रा.बोल्हेगाव गावठाण) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना २९ जुलैला सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास आलमगीर ते मोरे मळा रोडवर घडली.

आबासाहेब मल्हारी गोरे व गोकुळ अनिल पवार (दोघे रा.मोरे मळा, भिंगार, अ.नगर) यांनी २९ जुलै रोजी नागपंचमीच्या दिवशी

### विनापरवाना शर्यत भरविणाऱ्या दोघा आयोजकांविरुद्ध गुन्हा दाखल

बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. या शर्यतीचा मार्ग आलमगीर ते मोरेमळा जाणारे रोडवरुन मोरे मळा असा ठरवला. तसेच प्रेक्षकांच्या सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता बैलगाडा शर्यत सुरु केली. शर्यतीच्या दरम्यान होणाऱ्या आवाजाच्या गोंधळाने एका बैलगाड्याने त्याचा मार्ग सोडून तो थेट प्रेक्षकांमध्ये घुसला. तेथे बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी आलेल्या संजय जाधव यांना बैलाची धडक बसली. या धडकेने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी (नगर शहर विभाग) अमोल भारती, भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर व पोलीस उपनिरीक्षक गर्जेंद्र इंगळे यांनी घटनास्थळी भेट दिली.

या प्रकरणी पोलीस हवालदार दत्तात्रय मोरे यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन आबासाहेब गोरे आणी गोकुळ पवार यांच्याविरुद्ध बीएनएस कलम १०५, २२३, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गर्जेंद्र इंगळे करीत आहेत.

मयत संजय जाधव यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, २ मुले, १ मुलगी असा परिवार आहे. अभिजित व शुभम जाधव यांचे ते वडील होत. महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागात ते वॉलमन म्हणून कार्यरत होते.



सातवे पुण्यस्मरण
सर्व काही असुनही
काहीच नसल्यासारखे आहे
सर्व सुखांनी भरलेलं हे कुटुंब
तूझ्या वाचुन रिक्त आहे
स्व.सौ. नयन संजय कांबळे
स्व.दि. ३१/०७/२०१८
॥ तुझ्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली ॥
दुःखांकित
संजय काशिनाथ कांबळे (पती)
अनुजा संजय कांबळे (मुलगी) सेजल संजय कांबळे (मुलगी)
सोहम संजय कांबळे (मुलगा)
समस्त कांबळे परिवार

## केडगावमध्ये अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार तरुण ठार


सतीश वाघ (मयत)

नगर – नगर – पुणे महामार्गावर केडगाव उपनगरात रंगोली हॉटेल चौकात भरधाव वेगातील वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना २८ जुलै रोजी रात्री ११.५० वाजण्याच्या सुमारास घडली. सतीश चंदू वाघ (वय ३०, रा. पिंपळगाव माळवी, ता.नगर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

मयत सतीश हा त्याच्या होंडा शाईन या दुचाकीवर (क्र.एम एच १६ सी पी ९११५) नगरहून केडगाव कडे चाललेला होता. रंगोली चौकात तो भुषणनगरकडे वळण घेत असताना केडगावकडून नगरच्या दिशेने भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. त्यामुळे सतीश हा रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाला. या अपघातानंतर तेथे नागरिकांची गर्दी झाली. काहींनी रुग्णवाहिका बोलावली. कोतवाली पोलिसांना ही माहिती देण्यात आली. पोलिसांनी आणि काही नागरिकांनी त्यास रुग्णवाहिकेतून उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत डॉ. वाघ यांनी दिलेल्या अहवालावरून कोतवाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मयताच्या नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. मयत सतीश याच्या पश्चात आई आणि एक भाऊ असा परिवार आहे. त्याच्या वडिलांचे ६ महिन्यांपूर्वीच निधन झालेले आहे.


॥ तिसरे पुण्यस्मरण ॥
स्व. अमरलाल तलरेजा
स्वर्गवास दि. ३० जुलै २०२२
सौम्यता उनकी सुगंध थी, आनंद उनका जीवन था,
सत्कर्म उनकी शोभा और,
परोपकार उनका कर्तव्य था !
ईश्वर उनकी आत्मा को मोक्ष प्रदान करें।
आपकी पावन स्मृती में भावपूर्ण श्रध्दांजली
शोकांकित
समस्त तलरेजा परिवार
अ.नगर

भावपूर्ण श्रध्दांजली
कष्टातून संसार फुलविला, उरली नाही साथ आम्हाला,
आठवण येते क्षणा क्षणाला, आज ही तुमची वाट पाहतो, यावे पुन्हा जन्माला...

कै.अर्जुन रामराव सपकाळ
कळविण्यात अत्यंत वाईट वाटते की आमचे वडील यांना बुधवार दि.२३/०७/२०२५ रोजी देवाज्ञा झाली असुन त्यांचा
दशक्रिया विधी
शुक्रवार दि.०१/०८/२०२५ रोजी सकाळी ०८.०० वा.
ठिकाण
श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर, अमरधाम, भिंगार, ता.जि.अहिल्यानगर येथे होणार आहे
दुखांकित
प्रभाकर अर्जुन सपकाळ सागर अर्जुन सपकाळ
समस्त सपकाळ परिवार आप्तेष्ट व नातेवाईक
सम्राट तरुण मंडळ * हरदिन मॉर्निंग ग्रुप
सकल मराठा समाज, भिंगार,अहिल्यानगर
टिप - ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज अनावडे यांचे प्रवचन होईल

## टिळक रोडवरील दुकानातून चोरी

नगर – रात्रीच्या वेळी बंद दुकानाच्या केबिनच्या काचेच्या खिडकीतून आत प्रवेश करुन अज्ञात चोरट्याने टेबलच्या ड्रॉवर मधील ८ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना २७ जुलै रोजी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास शहरातील टिळकरोड येथील 'सुमतीलाल अॅण्ड सन्स' या बिल्डिंग मटेरियल दुकानात घडली.

याप्रकरणी प्रफुल्ल सुमतीलाल चोरडिया (वय ५३, रा. सुकमल बंगला, नंदनवन कॉलनी, चाणक्य चौक, बुरुडगाव रोड) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी चोरडिया हे ४० वर्षांपासून या ठिकाणी व्यवसाय करीत असून, दुकानाची देखरेख त्यांचे मॅनेजर संदीप करमाळकर पाहतात. २६ जुलै रोजी रात्री ८ वाजता दुकान बंद करुन करमाळकर घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता त्यांनी ऑफिस मधील खिडकी उघडी असल्याचे व ड्रॉवर मधील रक्कम गायब असल्याचे फिर्यादी यांना कळवले. त्यानंतर फिर्यादी हे तातडीने मंचरहून नगरला परतले. त्यांनी दुकानाची पाहणी करून दुकानातील सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता जर्किंग घातलेला एक अनोळखी इसम ऑफिसमध्ये काचेची खिडकी उघडून आता प्रवेश करून टेबलच्या ड्रॉवरमधून रोख रक्कम काढून घेत असल्याचे दिसले. त्यानंतर प्रफुल्ल चोरडिया यांनी २९ जुलै रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार संदीप पितळे हे करीत आहेत.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# कचऱ्याच्या विळख्यात गुदमरतंय अहिल्यानगर - आता पुरे झालं!

## शासन, प्रशासन जर झोपलं असेल, तर जनतेचा जागरूक आवाजच त्यांना जागं करू शकतो! न स्वच्छता, न नियोजन - ही काय महानगराची ओळख?

नगर - एकेकाळी स्वच्छतेचा, सुशोभीकरणाचा आणि सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगणारं आपलं नगर आज कचऱ्याच्या ढिगाऱ्यांखाली दबून तडफडतंय! शहरात जिथं नजर फिरवावी तिथं कचरा, दुर्गंधी आणि घाण साचलेली दिसते. लोकांनी टाकलेला नव्हे, तर प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे प्रचंड प्रमाणात साचलेला कचरा आज या शहराची नवी ओळख बनत चालली आहे.

घंटागाड्या वेळेवर येत नाहीत. कचरा उचलणं विसरलं जातंय. ठिकठिकाणी सडलेला, कुजलेला कचरा उघड्यावर पडून दुर्गंधी पसरवतोय. मच्छर, रोगराई आणि आरोग्याचा गंभीर धोका यामुळे नागरिकांचे जिणे मुश्कील झाले आहे.

### प्रशासन कुठे आहे? जबाबदारी कुणाची?

कचरा उचलणाऱ्या ठेकेदार संस्थेला म्हणे कर्मचाऱ्यांचे पगार द्यायला पैसे नाहीत! दुसरीकडे महापालिका आयुक्त सांगतात की ठेकेदाराचे काम असमाधानकारक आहे. कोणाला खरं मानायचं? आणि या आरोप-प्रत्यारोपाच्या चक्रात सामान्य जनता मात्र रोज कचऱ्यात जगते आहे.

नक्रोडं निसर्ग नाश करिती, पण माणूस अनास्थेने नगर नाश करितो!

या ढिसाळपणाच्या विरोधात आम्ही - काही सजग नगरिकांनी - स्वच्छता रक्षक समिती स्थापन केली. वेळोवेळी महापालिका आयुक्तांना, लोकप्रतिनिधींना भेटण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्युत्तर फक्त एक - सुस्त, निरुत्साही आणि बिनधास्त दुर्लक्ष!

नगरकरांनो, आता जागं व्हा!

आज अनेक नागरिक त्रासाला कंटाळून शहर सोडून इतर ठिकाणी स्थलांतर करत आहेत. पण हा मार्ग सुटकेचा असला, तरी तो अहिल्यानगरला अंधारात ढकलणारा आहे.

हा आपला जन्मभुमीवरचा हक्काचा लढा आहे!

उठा! जागे व्हा! आणि आपल्या हक्कासाठी संघटित व्हा!

**- स्वामी विवेकानंद**

या लेखाच्या माध्यमातून मी - सौ. प्रतिभा श्रीगोपाल धूत, स्वच्छता रक्षक समिती सदस्य - सर्व नगरकरांना साद घालते. आपण एकत्र आलो नाही, तर उद्या या शहरात राहणेच अशक्य होईल. हा प्रश्न केवळ घाणीकडे पाहण्याचा नाही, हा प्रश्न आपल्या भविष्यातील आरोग्याचा, आपल्या मुलांच्या सुरक्षिततेचा आणि आपल्या शहराच्या प्रतिष्ठेचा आहे!

आमचं पुढचं पाऊल आम्ही लवकरच स्वच्छता संघर्ष समिती स्थापन करून मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडणार आहोत. आम्ही रस्त्यावर उतरून, आवाज उठवून, शासनाला आणि प्रशासनाला झोपेतून जागं करणार आहोत.

आज लेख प्रसिद्ध करून आम्ही पहिला आक्रोश व्यक्त करतोय. उद्या या आक्रोशाचा आवाज, एक जनआंदोलन बनेल - यासाठी तुमचा साथ आवश्यक आहे!

जोपर्यंत झोपलेल्यांना जागं केलं जात नाही, तोपर्यंत सूर्यही उगवत नाही! संपूर्ण नगरकरांना आवाहन:

सक्रिय व्हा, सजग व्हा आणि पुढे या!

स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी अहिल्यानगरसाठी आपण सगळे मिळून या अस्वच्छतेच्या विळख्याचा अंत करूया!

**- सौ. प्रतिभा श्रीगोपाल धूत, ईश्वर बोरा,**
स्वच्छता रक्षक समिती सदस्य,
सर्व रोटरी क्लब्स, अहिल्यानगर

# प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
'मुसाफिर'-९८२२०२०६९१

## ये तेरा घर... ये मेरा घर... नीटनेटके ठेवा




घर - आपलं घर - आपलं भावविश्व असते. व्यापार, व्यवसाय वा नोकरीनिमित्त बाहेरील जगातून थकुन भागून आल्यावर विश्रांती अन् आनद देते ते असते आपले घर. मग ते स्वत:चे असो वा भाडेतत्त्वाचे. शहरातले भव्यदिव्य असो वा खेड्यामधले घर कौलारू.

तर अशा या आपल्या घरात आपले सगळे स्वप्नविश्व सामवले असल्याने ते स्वच्छ, सुंदर व नीटनेटके असावे असे प्रत्येकालाच वाटल्यास नवल ते काय?

आता तर निसर्गही विविधतेने नटलाय. सणासुदीच्या दिवसांमुळे विशेषत: घरची स्त्री आनंदाने साफसफाईच्या कामी लागते व गणपती, नवरात्रोत्सव व दिवाळी पर्यंत घर अधिक सुशोभित करण्याचा अविरत प्रयत्न करते. सायकॉलॉजी टुडेच्या संशोधनातून आढळून आले आहे की, अनावश्यक गोष्टी घरातील राहण्याची जागा कमी करतात आणि आजूबाजूला असल्याची नकारात्मक भावना निर्माण करतात. म्हणून घर व्यवस्थित ठेवताना एक यादी तयार करुन गरजेच्या वस्तू, गोष्टी एक एक करुन काढून टाकणे योग्य ठरते.

संशोधनात म्हटले आहे की, व्यवस्थित घराचा मनावर खूप सकारात्मक परिणाम होतो तर अस्ताव्यस्त आणि अव्यवस्थित वातावरणाचा आपल्या मोठ्यांसह घरातील मुलांवर वाईट, नकारात्मक परिणाम होतो.

तज्ज्ञांच्या अभ्यासानुसार जवळपास ८०% प्रसंगी आपण उपलब्ध असलेल्या कपड्यांपैकी व इतरही अनेक वस्तूंत फक्त २०% कपडे इ. वापरतो. उरलेल्या इतर न वापरलेल्या वस्तुंमुळे घर अस्वच्छ राहते. म्हणूनच म्हणतात ना न वापरल्या वस्तू, ढोबळ शब्दांत 'भंगार', दोषयुक्त, तुटक्या मोडक्या वस्तू इ. ना बाहेरचा रस्ता दाखवायला पाहिजे. घर सहज सुंदर, नीटनेटके ठेवून सकारात्मकता व आनंद, उत्साही ठेवू शकता. अहो, खेड्यातल्या सारवलेल्या अंगणातील तुळशी, रांगोळी, पारिजातकाचे झाड या साध्यासुध्या गोष्टी सुद्धा मनाला रिझवतातच ना... फक्त व्यवस्था व नजर सुंदर पाहिजे.

# घरफोड्या करणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीला अटक; ५ लाख ४५ हजारांची १०० ग्रॅम सोन्याची लगड जप्त

### ३ घरफोडीचे गुन्हे उघड

नगर - नगर शहरात घरफोड्या करणाऱ्या चौघा सराईत गुन्हेगारांच्या टोळीला तोफखाना पोलिसांच्या पथकाने अटक केली असून त्यांच्या कडून तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ३ घरफोड्यांचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या घरफोड्या करून चोरलेले सोन्याचे दागिने वितळवून त्याची केलेली एकूण ५ लाख ४५ हजारांची १०० ग्रॅम लगड पोलिसांनी हस्तगत केली आहे.



नगर शहरात घरफोड्या करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला अटक केल्यानंतर त्यांच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

कैलास चिंतामण मोरे (रा. सोनगीर, जि.धुळे), जयप्रकाश राजाराम यादव (रा.दिनदासपुर, जि.वाराणसी, उत्तर प्रदेश), रविंद्र आनंद माळी (रा. सोनगीर, जि.धुळे), सुशिल ऊर्फ सुनिल ईश्वर सोनार (रा.बालाजीनगर, शिंगावे, जि.धुळे) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

सावेडी उपनगरातील दसरे नगर येथील गणेश सुधाकर मंचरकर यांच्या शिवसुदा रेसीडेन्सी मधील घरातून १५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३ ते सांयकाळी ५.१५ चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने ५३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेली होती. त्यांच्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. या गुन्ह्याच्या तपासत सदरचा गुन्हा हा या चौघा सराईत गुन्हेगारांच्या टोळीने केल्याचे समोर आल्यावर पोलिसांनी त्यांना अटक केली आहे.आरोपींनी वरील प्रमाणे गुह्यांची कबुली देवुन गुन्ह्यात चोरी केलेला मुद्देमाल काढुन दिल्याने तो तपासात जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण, पो.हे.कॉ.बाळासाहेब गिरी, गोरख काळे, दिपक गांगर्डे, भानुदास खेडकर, सुधिर खाडे, सुरज वाबळे, पो.ना.रमेश शिंदे पो. कॉ. सुमित गवळी, सतिष त्रिभुवन, भागवत बांगर यांच्या पथकाने केली आहे.

# बुऱ्हाणनगरमध्ये तरुणावर कोयत्याने वार; जीवघेणा हल्ला


नगर - खुन्नसने पाहतो या कारणावरुन तरुणाला ७ जणांच्या तोळक्याने शिवीगाळ करत लाथाबुक्क्यानी मारहाण केली. तसेच धारदार कोयत्याने वार करुन गंभीर दुखापत केल्याची घटना नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर येथील जगदंबामाता मंदिराच्या पाठीमागील कमानी जवळील २९ जुलै रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत रेहान गालीब खान (वय १८, रा. जगदंबामाता मंदिराच्या पाठीमागे, बुऱ्हाणनगर) याने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीतील माहितीनुसार सलमान रफिक शेख (रा.कापूरवाडी ता. नगर), कार्तिक अनिल कर्डिले, सिद्धार्थ नवले, गौरव अनिल कर्डिले व रोहन नितीन शिंदे (सर्व रा. बुऱ्हाणनगर, ता.नगर) यांनी दत्ता तापकिरे व संदीप निमसे (दोघे रा. बुऱ्हाणनगर) यांच्या सांगण्यावरुन फिर्यादी यास शिवीगाळ दमदाटी करुन लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. यातील सलमान शेख याने पाठीमागून जाऊन फिर्यादीच्या पाठीवर व उजव्या हाताच्या दंडावर धारदार कोयत्याने मारून गंभीर दुखापत करून तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. या मारहाणीत फिर्यादी हा गंभीर जखमी झाला. त्यास घटनास्थळा जवळील नागरिकांनी उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात रेहान खान यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलमान शेख, कार्तिक कर्डिले, सिद्धार्थ नवले, गौरव कर्डिले, रोहन शिंदे, दत्ता तापकिरे, संदीप निमसे यांच्याविरुद्ध बी एन एस कलम ११८ (१), ११५ (२), ३५१ (२) (३), ३५२, १८९ (२), १९०, १९१ (२) (३) आर्म अ‍ॅक्ट ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलीस हवालदार कविता हरिश्चंद्रे या करीत आहेत.

## डॉ. विनयकुमार डावरे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - हातमपूरा येथील डावरेगल्लीतील रहिवासी व डावरे हॉस्पिटलचे संचालक डॉ. विनयकुमार रामचंद्र डावरे (वय ८७) यांचे २९ जुलै रोजी अल्प आजाराने पुणे येथे निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राहुल, इंद्रनील व अमोल डावरे यांचे ते वडील होत.

## शिवाजी वराडे यांचे दुख:द निधन

नगर - तोफखाना शेरकरगल्ली येथील रहिवासी शिवाजी जगन्नाथ वराडे (वय ६६) यांचे २९ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. कापड बाजार येथील आदर्श ड्रेसेसचे ते संचालक होते. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महेश वराडे यांचे ते वडील होत.



## जनाबाई घोलप यांचे अल्प आजाराने निधन

नगर - भातोडी पारगाव येथील रहिवासी जनाबाई नामदेव घोलप (वय ७५) यांचे २९ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भातोडी पारगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ४ भाचे, ३ नातु असा परिवार आहे. भातोडी पारगाव येथील हॉटेल बाळकृष्णचे महेश, अमोल, राहुल घोलप यांच्या त्या आजी होत.



## गंगुबाई आव्हाड यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - नगर तालुका मजले चिंचोली येथील गंगुबाई नाथा आव्हाड (वय १०२) यांचे २९ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर मजले चिंचोली येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ४ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते रामदास आव्हाड, मारुती, लक्ष्मण, भगवान आव्हाड, नंदा पालवे यांच्या त्या मातोश्री होत.

## दत्तात्रय साळुंके यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील पंचायत समितीचे क्लार्क दत्तात्रय पुनीलाल साळुंके (वय ४६) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई - वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. पं.स.चे सेवानिवृत्त कर्मचारी पुनीलाल साळुंके यांचे चिरंजीव होत.

# चाकूचा धाक दाखवून महामार्गावर प्रवाशांना लुटणारी टोळी जेरबंद

### गुन्ह्यातील कार, मोबाईल,चाकुसह ६ लाख ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

नगर - महामार्गावर वाहनाची वाट पाहत थांबलेल्या प्रवाशांना हेरून त्यांना कार मध्ये बसवून नंतर चाकूचा धाक दाखवत त्यांच्याजवळील पैसे व इतर वस्तू लुटणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पकडले आहे. महेश आबासाहेब शिरसाठ (वय २६), गौरव शहादेव शिरसाठ (वय २५, दोघे रा. म्हसले, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) अशी दोघांची नावे असून त्यांच्या कडून लुटीतील रोख रक्कम, लॅपटॉप, मोबाईल फोन, घड्याळ व गुन्ह्यात वापरलेली कार आणि चाकू हस्तगत करण्यात आला आहे.



चाकूचा धाक दाखवून महामार्गावर प्रवाशांना लुटणारी टोळी जेरबंद केल्यानंतर हस्तगत केलेल्या मुदेमालासमवेत पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, पो.नि. किरणकुमार कबाडी व स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नेवासा फाटा येथे धर्मनाथ टिकाराम जोहरे (रा.गारखेडा परिसर, छत्रपती संभाजी नगर) हे १७ जुलै रोजी रात्री ९ च्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथे जाण्यासाठी गाडीची वाट पाहत असतांना त्यांना एका स्विफ्ट कार चालकाने छ.संभाजीनगर येथे सोडतो असे म्हणुन कार मध्ये बसवुन घेतले आणि काही अंतरावर गेल्यावर चाकुचा धाक दाखवून व मारहाण करुन त्यांच्या कडील रोख रक्कम्, लॅपटॉप,मोबाईल फोन,घड्याळ काढून घेवून त्यांना कार मधून खाली उतरवून दिले.या बाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस स्टेशन येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार या गुन्ह्याचा सम ांतर तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. किरणकुमार कबाडी यांनी पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ,पोलीस अंमलदार सुरेश माळी, फुरकान शेख, सोमनाथ झांबरे, संदीप दरंदले, प्रमोद जाधव, किशोर शिरसाठ, भाऊसाहेब काळे,उमाकांत गावडे, महादेव भांड यांचे पथक नियुक्त केले होते. तपास पथकातील अंमलदार यांनी घटना ठिकाणचे व आजुबाजुचे रोडचे सी.सी.टी. व्ही. फुटेज चेक करुन आरोपीबाबत माहिती जमा करून महेश शिरसाठ यांनी आणि त्याच्या एका साथीदाराने हा गुन्हा केला असल्याची माहिती मिळवली.

त्या नुसार पोलिसांनी सापळा रचून महेश आबासाहेब शिरसाठ व गौरव शहादेव शिरसाठ यांना नेवासा फाटा येथे पकडले. या दोघांकडे कसून चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली.त्यांच्याकडील लॅपटॉप, मोबाईल फोन,रोख रक्कम, गुन्ह्याच्या वेळी वापरलेली कार, मोबाईल,चाकु असा एकुण ६ लाख ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या आरोपींना पुढील कारवाई साठी नेवासा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## दुचाकीची चोरी

नगर - रस्त्याच्या कडेला हॅन्डल लॉक करुन लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल ( क्र.एम एच १२ बी क्यू ५८४२) अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना जिल्हा सहकारी बँकेच्या बाजूला असणाऱ्या मार्केट यार्ड कडे जाणाऱ्या रोडवर सहकार सभागृहासमोर २७ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात ऋषीकेश भागचंद सकट (वय २५, रा. गुंडेगाव ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# तलाठी असल्याची बतावणी करत पिकविम्यांचे पैसे मिळवून देण्याच्या बहाण्याने वृद्ध महिलेला फसवून दागिना पळविला

नगर - मी तलाठी आहे, तुम्हाला ओळखतो असे म्हणून तुमचे पिक विम्याचे पैसे आले आहेत, चला तहसील कार्यालयात असे सांगुन एका अज्ञात व्यक्तीने ८० वर्षीय वृद्ध महिलेचा विश्वास संपादन करुन तिच्या गळ्यातील ७ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत लंपास केल्याची घटना २९ जुलै रोजी दुपारी १२.४५ च्या सुमारास चाणक्य चौक परिसरात घडली.

याबाबत इंदुबाई गेणू हारदे (वय ८०, रा. हारदेवस्ती, वडनेर हवेली, ता. पारनेर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या मुलीसोबत डोळ्याच्या तपासणीसाठी आनंदऋषी नेत्रालयात गेल्या होत्या. तपासणी करुन बाहेर पडून त्या दोघी चालत माळीवाडा बसस्थानकाकडे येत असताना चाणक्य चौकाजवळ एका इसमाने त्यांना थांबवले. मी तलाठी आहे, तुमचे पिक विम्याचे पैसे आले आहेत, चला तहसीलमध्ये सही करुन तुमचे पैसे काढून देतो असे सांगून त्याने फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादी यांना मोटारसायकलवर बसवून चाणक्य चौकाच्या पुढे नंदनवन कॉलनी येथे नेले. तेथे तो फिर्यादी यांना म्हणाला की तुम्हाला ऑफिसमध्ये घेऊन जातो, तेथे १०० रुपये दंड भरुन आपले दागिने तेथे देवून आपलें पैसे ताब्यात घ्यायचे असे सांगून त्याने त्यांच्या गळ्यातील ७ ग्रॅम वजनाची, चार मण्यांची सोन्याची पोत मागून घेतली. त्यानंतर फिर्यादी यांना पुन्हा चाणक्य चौकात घेऊन गेला व मोटरसायकलचे खाली उतरवून एक मिनिटांमध्ये ऑफिसमध्ये जाऊन येतो असे सांगून तिथून निघून गेला.बराच वेळ वाट पाहूनही तो परत आला नाही.म्हणून फिर्यादी या परत बसस्थानकावर आल्या. तेथे त्यांची मुलगी फिर्यादीची वाट पाहत होती. फिर्यादी यांनी नातेवाईकांना बोलावून सगळी माहिती दिल्यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

या प्रकरणी इंदुबाई हारदे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस कलम ३१६(२), ३१८ (४), ३१९ (१) प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील पोलीस हवालदार योगेश कवाष्ठे हे करीत आहेत.

## घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

नगर - राहत्या घरासमोर रस्त्याच्या कडेला लावलेली होंडा कंपनीची सी बी युनिकॉर्न मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी एच ७८८२) अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना सावेडी उपनगरातील मिस्कीननगर, कृपाल आश्रम मागे २८ जुलै रोजी रात्री ९ ते २९ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याप्रकरणी शुभम अनिल जग्गी (वय ३०,रा. कृपाल आश्रम मागे, मिस्किन मळा, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार प्रवीण खंडागळे हे करीत आहेत.

## केडगावमध्ये जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन धार्मिक कार्यक्रम घेणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन केडगाव परिसरात परवानगीशिवाय धार्मिक कार्यक्रम घेतल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आला आहे. ही कारवाई केडगाव येथील अमरधाम रोडवरील मोसंबी बागेच्या शेजारील पत्र्याच्या शेडमध्ये २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

केडगाव अमरधाम रोडवरील मोसंबी बागेच्या शेजारील पत्र्याच्या शेडमध्ये मोठ्या संख्येने लोक जमले असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस तेथे गेले असता तेथे आशिष अभय सत्राळकर (रा. प्रेमदान चौक, सावेडी) आणि गणेश लाहवरे (रा. एकविरा चौक, अ.नगर) हे ५० ते ६० लोकांना जमवून मोठ्या आवाजात लाऊडस्पीकर लावून कार्यक्रम घेत असल्याचे आढळून आले.पोलिसांनी त्यांच्याकडे विचारणा केली असता कार्यक्रम व लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी नसल्याचे त्यांनी कबूल केले. जिल्ह्यात १४ जुलै ते २७ जुलै २०२५ दरम्यान जमावबंदी लागू असूनही त्यांनी आदेशाचे उल्लंघन करुन कार्यक्रम सुरु ठेवला. याप्रकरणी पो. कॉ.अनुप झाडबुके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आशिष सत्राळकर व गणेश लहावरे या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड करत आहेत.

## १ ऑगस्ट रोजी नवीपेठ जैन स्थानकात आनंद चालीसा पाठ

नगर - महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेतून नवीपेठ जैन स्थानकात १ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता आनंद चालीसा पाठ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दर शुक्रवारी रात्री ९ वाजता आनंद चालीसा पाठ होणार आहे. भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आनंद गुरू भक्त परिवार व जैन श्रावक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.



# गृहिणी

## आरोग्य

### हे पदार्थ दूर ठेवा...

✻ नेहमी लक्षात ठेवा की, तुमच्या आहाराचे प्रमाण योग्य असावे. तुमच्या आहारातून सगळ्यात आधी स्टार्चचे प्रमाण अधिक असणारे म्हणजे भात, बटाटा, ब्रेड असे पदार्थ काढून टाका. शीतपेय पिण्याची सवय सोडण्याचा प्रयत्न करा. ही सवय तुमच्या शरीरासाठी फायदेशीर नाही. दुध घालून चहा किंवा कॉफी पिण्याच्या सवयीला सुद्धा बाय बाय करा. चहा-कॉफीतील जास्त साखरेचे प्रमाणही नुकसानकारक ठरते.

✻ कोणत्याही भांड्यात खूप दिवसापर्यंत पाणी साठू देऊ नये. याने डेंग्यूचा धोका वाढतो. पाणी नेहमी झाकून ठेवावे आणि दररोज भांडे स्वच्छ करून पाणी भरावे.

✻ कूलर वापरत असल्यास दर रोज पाणी बदला. डासांपासून बचावासाठी खिडकी आणि दारात निट लावावी पूर्ण बाह्याचे कपडे घालावे.

## पाककला

### खजूर रोल

**साहित्य :** चारशे ग्रॅम बिन बियाचा खजूर, दोन चमचे साय, काजू, पिस्ते, बदाम यांचा पाऊण कप भरड चुरा, दहा मारी बिस्किटांचा पूड.

**कृती :** एका जाड बुडाच्या पातेल्यात साय घालून वितळवावी. त्यावर खजूर बारीक करून टाकावा आणि मिश्रण कुस्करत कुस्करत आठ-दहा मिनिटे परतावे. बिस्किटाची दोन चमचे पूड बाजूला ठेवून उरलेली पूड या मिश्रणात टाकावी. मिश्रण नीट एकजीव करावे व उतरवावे. आता एका ॲल्युमिनियम फॉईलवर बिस्किटांचा उरलेला चुरा भूरभूरावा व त्यावर हा खजुराचा गोळा आयताकृती लांब असा लाटावा. त्यावर काजू-पिस्ते-बदामाचा चुरा पसरावा. हलक्या हातानं फॉईलच्या मदतीने रोलप्रमाणे घट्ट गुंडाळून तसाच फॉईलसकट फ्रीजमध्ये ठेवावा. तीन-चार तासांनी हा रोल बाहेर काढून स्विस रोलप्रमाणे त्याच्या चकत्या कापाव्यात व थंडगारच द्याव्यात.

## वास्तू

✻ डायनिंग टेबल किचनमध्येच पश्चिमेकडे ठेवावे. किचन नेहमी स्वच्छ ठेवावे. कचरा किंवा कचऱ्याची पेटी स्वयंपाक घरात न ठेवल्यास अतिउत्तम. स्वयंपाकाचा गॅस ओट्याच्या उजव्या बाजूस ठेवावा. आजच्या चौकस गृहिणी किचनच्या रंगसंगतीकडेही चोखंदळपणे लक्ष देतात. रंगसंगती शक्यतो साधी असावी. स्वयंपाक घरातील भिंतींवर निळा किंवा पांढरा रंग लावल्यास अतिउत्तम.

✻ कोणत्याही घरातील 'ईशान्य कोपरा' ही दिशा म्हणजे साक्षात ईश्वराचे स्थान आहे. या दिशेस नित्यनेमाने पूजा केल्यामुळे सर्व सुखांची प्राप्ती होते, असे वास्तुशास्त्राने मानले आहे. या दिशेहूनच सर्व शुभ, सकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करतात. ईशान्य दिशा ही 'सात्त्विक ऊर्जा'चा प्रमुख स्त्रोत आहे. हे घरातील सर्वात थंड क्षेत्रही आहे. वास्तुपुरुषाचे डोके ईशान्य दिशेकडे असते.

## सल्ला

✻ चार-पाच वेळा तुरटी फिरविलेल्या पाण्यात छोले भिजत घालावेत, छोले मऊ होतात.

✻ घराच्या मुख्य दरवाजासमोर विजेचा खांब, दुसऱ्या घराचा जिना अत्यंत अशुभ.

## सौंदर्य

✻ चेहऱ्यावर स्क्रबिंग करण्याची सुयोग्य पद्धत म्हणजे प्रथम चेहरा स्वच्छ धुऊन घ्यावा. कापूस वा हाताने स्क्रब कपाळापासून सुरु करून संपूर्ण चेहऱ्याला हळूहळू लावावे.

✻ थंड पाणी सेल त्वचा तुकतुकीत राखण्यास व रक्ताभिसरण व्यवस्थित करण्यासाठी प्रभावी असते. कुस्करलेला बटाटा रेशमी कापडात बांधून रोज थोडा वेळ डोळ्यांवर ठेवल्यास डोळ्यांखालील काळवंडलेपणा नाहीसा होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ३१ जुलै २०२५

**सीतला सप्तमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, चित्रा २४।४२, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** काही अडचणींनंतर यश मिळेल. व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. आरोग्य उत्तम राहील.

**वृषभ :** आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील. नवीन कार्यांचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

**मिथुन :** कौटुंबिक विषयांमध्ये काळजी घ्या. नोकरदार व्यक्तींनी कार्यात सावधगिरी बाळगावी.

**कर्क :** आपल्या कौटुंबिक तणावांचा समस्यांचा प्रभाव आपल्या कार्यावर होऊ देऊ नका.

**सिंह :** यथायोग्य विचार करून कामे करा. कौटुंबिक विषयांसाठी वेळ उत्तम राहील.

**कन्या :** बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील.

**तूळ :** दिवस चांगला आहे. आपल्या छान वागण्याने इतरांना हवेहवेसे वाटू शकता.

**वृश्चिक :** मित्रांबरोबर सामुदायिक उपक्रम किंवा पिकनिकच्या रूपात दिवसाचा आनंद घेऊ शकता.

**धनु :** मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. अनुकूल वार्ता मिळतील. नोकरीपेशा व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे.


**मकर :** आज पैसे आणि बळाची विशेष भूमिका राहील. केव्हातरी एखाद्या सामाजिक समारंभात आपल्या विचारांचा परिणाम होईल.

**कुंभ :** महत्वाच्या बातम्या मिळाल्याने आपण एक सुखद परिस्थितीत आपणास बघाल.

**मीन :** जवळच्या नात्याचा आनंद घेण्यावर आपले चित्त एकाग्र करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२३२ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२३१ चे उत्तर



**उभे शब्द :-** १) गबाळा; वेडपट ४) प्रश्न ६) नाश पावलेला भाग; मरणोन्मुख अवस्था ७) आश्चर्य; आश्चर्यकारक गोष्ट ९) बांगड्या भरणारा किंवा विकणारा ११) पदार्थाचा उडालेला तुकडा १३) ज्याअर्थी; 'जर'च्या विरुद्ध १४) चार वार्णींपैकी एक १६) शुष्क; ओला नसलेला १७) अस्थिर; दोलायमान; डगमगीत १९) एक केसाळ जंगली प्राणी; अस्वल २१) वेष; पोशाख २२) वडिलोपार्जित चालत आलेली जमीन वगैरे मालमत्ता

**आडवे शब्द :-** १) नियम; व्रत; लक्ष्य; शिस्त २) अतिशय वेगाने ३) टोचणी; नखाने आघात केल्याने होणारा आवाज ४) आदर; गौरव; सन्मान ५) आघात; जखम; घाव ८) अनेक पदार्थांचे सुवासिक मिश्रण जे कालवणात वगैरेत वापरले जाते १०) झुडपांवर वगैरे सरपटणारा एक जीव ११) आघात; प्रहार १२) कपडा; वस्त्र; वसन १३) चलाख; हुशार; ताजातवाना १५) एक ज्वालाग्राही पदार्थ १६) मासेमारी करणारी एक जमात; एक कीटक १८) मौज; आनंद २०) साल; वर्ष; शक

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : आत्म्यामध्ये परमात्म्याचा साक्षात्कार प्राप्त करणे हेच जीवनाचे ध्येय असते. **– रवींद्रनाथ टागोर.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### फॉसी जॉ म्हणजे काय?

तुमच्या विज्ञानाच्या पुस्तकात तुम्ही फॉसी जॉ विषयी वाचले असेल. पिवळ्या फॉस्फरसमुळे हा रोग होते, हेही तुम्हाला माहीत असेल. या आजाराची थोडक्यात माहिती घेऊ.

आजकाल हा रोग जास्त आढळत नाही. काडेपेट्यांच्या कारखान्यात जेव्हा पिवळ्या फॉस्फरसचा वापर केला जायचा, तेव्हा हा रोग जास्त आढळून यायचा. या कारखान्यात काम करणाऱ्या लोकांच्या श्वासावाटे पिवळा फॉस्फरस त्यांच्या शरीरात जात असे. अनेक महिन्यांनंतर वा वर्षांनंतर या व्यक्तीमध्ये फॉसी जॉ ची लक्षणे दिसून येत. किडलेल्या दातावर पिवळ्या फॉस्फरसचा प्रामुख्याने परिणाम होतो. सुरुवातीला दातदुखी होते, मग जबडा सुजतो, दात सैल होतात, हिरड्या खराब होतात व जबड्याचे हाडही रोगग्रस्त होते. यालाच फॉसी जॉ असे म्हणतात. जबड्याच्या हाडात पू होतो व तो काही रंध्रांतून बाहेर येऊ लागतो. याला दुर्गंधी असते. हाडाचे आपोआप फ्रॅक्चरही होऊ शकते. जबड्यातील या लक्षणाखेरीज थकवा, रक्तक्षय व सांधेदुखीही दिसून येते. यकृतही रोगग्रस्त होते.

हा रोग टाळण्यासाठी अशा प्रकारच्या कारखान्यात काम करणाऱ्या व्यक्तींची वारंवार वैद्यकीय तपासणी करायला हवी. क्ष-किरण तपासणीचाही त्यात अंतर्भाव असावा. दुसरे व महत्त्वाचे म्हणजे पिवळ्या फॉस्फरसऐवजी दुसऱ्या सुरक्षित अशा पदार्थांचा या कारखान्यात वापर करावा. असा उपयोग सुरू झाल्यानेच आजकाल आपल्याला फॉसी जॉ हा रोग क्वचितच आढळून येतो.

### घरचा आहेर

तो महाकंजूष शेटजी शेजारी कोणी नाही, हे पाहून आपल्या तिजोरीतले पैसे मोजत होता. इतक्यात त्याचा पोपट पिंजऱ्यातून निसटून तेथे आला. त्यातील एक सोन्याची मोहोर चोचीत धरून त्याच खोलीतल्या कोनाड्यात दडवून ठेवू लागला. एकदा मोजलेले पैसे शेटजी पुन्हा मोजू लागला असता सोन्याची एक मोहोर कमी भरली. तेव्हा दुःखी होऊन उभा राहिला. समोर पाहतो, तर पोपट कोनाड्यात काहीतरी दडवीत असलेला दिसला. तेव्हा तो पोपटाला म्हणाला,

''अरे चोरा तूच चोरलीस ना सोन्याची मोहोर. अरे पण तुला तिचा काही उपयोग तरी आहे का? उलट तुझ्या या चोरीबद्दल मी तुला चांगलीच शिक्षा मात्र करीन. जीवसुद्धा घेईन बघ.''

हे ऐकून पोपट म्हणाला, ''शेटजी उगीच संतापू नका. तुम्ही जे करता तेच मी केले. मी फक्त एक मोहोर लुबाडून दडवून ठेवली तर तुम्ही शिक्षा म्हणून माझा जीव घेईन म्हणता.

मग तुम्ही या हजारो मोहोरा लुबाडून दडवून ठेवल्याबद्दल तुम्हाला कोणती जबर शिक्षा द्यावी हे सांगाल काय?'' यावर शेटजीची दातखीळच बसली.

**तात्पर्य** : आपले दोष न पाहता दुसऱ्यांच्या दोषाला नावे ठेवणे हा काहींचा स्वभावच असतो.

## जीवन का अमृत (भाग १)



### बसंत ऋतु

महापुरुष, Living Master या मुर्शिदे-कामिल के नाम से पुकार सकते हैं। किसी महापुरुष की शरण में पहुँचना बहुत बड़ी बरक़त है।

सभी महापुरुषों, जैसे कबीर साहिब, गुरु साहिबान और दूसरे संतों के साथ साथ इस शब्द में सहजोबाई जी ने हमें गुरु का महत्त्व बताया है।

इस शब्द में पहली दो पंक्तियों में ही सहजोबाई जी ने रूहानियत का निचोड़ हमारे सामने पेश कर दिया है। यहाँ वे फ़रमा रही हैं :

हरि किरपा जो होय तो, नाहीं होय तो नाहिं।
पै गुर किरपा दया बिनु, सकल बुद्धि बहि जाहिं।।

८४ लाख जियाजून में मानव चोले को सबसे उत्तम माना गया है क्योंकि इसमें आकाश तत्व प्रबल है, इसी कारण यह सत्य और असत्य का निर्णय कर सकता है। सत्य क्या है, इसके बारे में इंसान निर्णय कर सकता है और सचाई को ग्रहण कर सकता है, असत्य को छोड सकता है। जब हमें मालूम हो जाए कि असत्य क्या है, तो उससे हम दूर हटेंगे, सचाई की ओर चलेंगे। जडता असत्य है और चेतनता सत्य है।

लेकिन जड़ता ने हम पर इस प्रकार जादू कर दिया है कि हमें माया ही सत्य नज़र आ रही है। मानव चोला मिलते ही हम असत्य को सत्य मानकर अपना सारा जीवन गुज़ार देते हैं, लेकिन जब हम महापुरुषों की शरण में पहुँचते हैं, तो वे हमें जड़ और चेतन के अंतर को समझाते हैं। वे हमें पढ़ाते-लिखाते नहीं, किन्तु सचाई यह है कि सत्य उनके रोम-रोम में बसा होता है और वह हम तक छूत की बीमारी की तरह पहुँच जाता है। परम संत कृपालसिंह जी महाराज फरमाया करते थे : Spirituality cannot be bought and cannot be taught, but it can be caught from someone who is One with the Lord,' रूहानियत को सीखा नहीं जा सकता, ख़रीदा नहीं जा सकता, लेकिन जब हम किसी जीवित सत्स्वरुप महापुरुष की शरण में जाते हैं, तो हम रूहानियत को पकड़ सकते हैं। जब तक दूध में थोडासा जाग (खट्टा) न लगाया जाए, तब तक वह दही नहीं बनता, वही हालत इंसान की है। इस शरीर को जिसे हम अपना असली रुप समझते हैं, यह माया का मॅटर का बना हुआ है जब की हमारी आत्मा चेतन है, ज्ञान संपन्न है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

हम डॉक्टरों व अस्पतालों से आग्रह करते हैं कि कुछ भी करके वे मरणासन्न मरीज को बचा लें, कभी-कभी तो हम भारी रकम खर्च कर देते हैं, रोगी को कुछ दिन या कुछ सप्ताह जीवित रखने के लिए, जबकि हमें पता होता है कि बचने की कोई उम्मीद नहीं बची है। इंग्लैंड में आधी से अधिक मौतें अस्पताल में होती हैं, हालाँकि रोगी कभी नहीं चाहता है कि अस्पताल पहुँचकर उसकी मृत्यु हो।

वास्तविकता का हमारा आंतरिक 'नक्शा' हमें बताता है कि हम भौतिक जीव हैं और यह भी कि देह के साथ ही सबकुछ समाप्त हो जाता है, तो फिर क्यों हम मृत्यु को सबसे बड़ा दुःख मानकर चलते हैं और उसे टालना ही परम प्राथमिकता बना लेते हैं। जीवित लोगों के मन में हम अपनी जो स्मृतियाँ छोड़ जाते हैं, उसके अलावा हमारे जीवन का मूल्य क्या रह जाता है।

जब हमें एहसास हो जाता है कि मृत्यु भ्रामक है, इस अर्थ में कि हमारा अस्तित्व कभी मिटता नहीं है, तो फिर मृत्यु का दंश निकल जाता है। हमें जब यह ज्ञान हो जाता है कि इस शरीर को त्यागने पर हम खुद को अतीव आनंद की स्थिति में पा सकते हैं, मृत्यु तब और भी अधिक आकर्षक प्रतीत हो सकती है। हम जब जान जाते हैं कि हम संसार के रंगमंच पर शाश्वत रूप से अपनी-अपनी भूमिका निभाते हैं और यह भी कि हम जिस ढंग से अपनी देह छोड़ते हैं, वह आत्मा के भविष्य के लिए इसी समय एक प्रक्षेपण-पक्ष बना देता है, तब हमें ईश्वर द्वारा प्रदत्त सभी शक्तियों एवं सद्गुणों को लेकर आत्मचेतना में चले जाने का महत्त्व और मूल्य समझ आता है।

एलिजाबेथ कुबलर रॉस की कृति ने मरणासन्न की देखभाल में एक क्रांति लाने जैसा काम किया। इसने सेवागृह और उपशामक देखभाल संबंधी आंदोलनों को और आगे बढ़ाने में सहायता की तथा मृत्यु की धारणा को प्रतिष्ठा दिलाई। मृत्यु के पश्चात् जीवन की निरंतरता के बारे में उसके विचारों से चिकित्सा और विज्ञान के क्षेत्र में उसके अनेक सहयोगी सहमत नहीं थे, फिर भी लाखों-करोड़ों लोगों को मृत्यु और मृत्यु के निकट पहुँचने के अनुभव के बारे में बहुत कुछ अर्थपूर्ण जानकारी प्राप्त करने में सुविधा हुई। उपशामक उपचार में मरीजों के भावनात्मक और शारीरिक दुःख-दर्द को कम करने और उस दुःख-दर्द का निवारण करने पर ध्यान दिया जाता है। जहाँ तक मरने की प्रक्रिया को आसान बनाने का संबंध है, इससे न केवल रोगियों, बल्कि गंभीर या पुरानी बीमारी झेलनेवाले परिवारों के लिए भी जीवन की गुणवत्ता काफी सुधर जाती है। उपशामक उपचार में संलग्न डॉक्टरों का कहना है कि इससे पारंपरिक औषधीय उपचार की उपयोगिता भी उन्नत हो सकती है तथा जीवनकाल में वृद्धि हो सकती है। संभवत: यही दादी जानकी के साथ हुआ है। उनका अधिकतर जीवन खराब सेहत के कारण कष्ट में बीता, लेकिन इस पुस्तक के लिखने तक, लगभग सौ के बाद भी उनकी सक्रियता में कोई कमी नहीं आई है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडिलांनी राजूची झडती घेतली, सिगरेट, मुलींचे नंबर निघाले..
वडिलांनी राजूला बदड बदड बदडले ..
आणि म्हणाले केव्हा पासून सुरु आहे हे सगळे?
राजू रडत रडत,पप्पा हि पॅन्ट माझी नाही तुमची आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ वर्ष २०२२ चा सिंगापूर फॉर्म्यूला वन ग्रँड प्रिन्स रेस विजेता कोण?
– सर्जियो पेरेझ

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

### लवंग

फार प्राचीन काळापासून आहारशास्त्राबरोबरच आयुर्वेदशास्त्रात देखील लवंगांचा वापर केला जातो. अनेकजण घरगुती औषध म्हणूनही तिचा वापर करतात. मसाल्यामध्ये सुगंध आणण्यासाठी लवंगेचा वापर केला जातो. मराठीमध्ये 'लवंग', हिंदीमध्ये 'लौंग', इंग्रजीत 'क्लोव्ह', संस्कृतमध्ये 'देवकुसूम', तर शास्त्रीय भाषेत 'युजेनिआ कॅरिओफिलाटा' (Eugenia Caryophylata) या नावाने ओळखली जाणारी लवंग 'मिर्टेसी' या कुळातील आहे.

लवंगेचे झाड पंचवीस ते चाळीस फूट उंच व वर्षभर हिरवेगार असते. या झाडावर तीन-तीन गुच्छांचा समूह तयार होतो. या गुच्छांना कळ्या लागतात. या कळ्या फुलून लहान फुले होतात. या फुलांनाच आपण 'लवंग' असे म्हणतो. जेथे पाऊस खूप पडतो, तेथे लवंगेचे झाड दिसून येते. जगामध्ये सिंगापूर व पूर्व आफ्रिकेत ही झाडे भरपूर प्रमाणात आहेत. मलाक्का, जंगबार व त्याच्याजवळ असणाऱ्या फेम्बा टापूमध्ये लवंगेची झाडे अधिक प्रमाणात आहेत. भारतामध्येही लवंगेची झाडे आढळतात. परंतु त्याचे प्रमाण खूप कमी आहे. लवंगेचे दोन प्रकार आहेत. एक तीव्र सुगंधाची काळी लवंग व दुसरी धुरकट रंगाची लवंग होय. जी लवंग उग्र वासाची, तिखट आणि दाबल्यानंतर तिच्यामध्ये तेलाचा अंश असल्याचे जाणवते. ती उत्तम प्रतीची असते.

**औषधी गुणधर्म :**

**आयुर्वेदानुसार :** लवंग सुगंधी, उत्तेजक, रक्तविकारनाशक, कफघ्न, अग्निदीपक, पाचक, दुर्गंधीहारक, रुची उत्पन्न करणारी, डोळ्यांना हितकारक आहे. तिच्या या गुणधर्मामुळे मळमळणे, उलटी होणे, पोटात कळ येणे, तीव्र दातदुखी, डोळे दुखणे, पोट फुगणे, अति तहान लागणे, खोकला, श्वास अशा अनेक विकारांवर तिचा उपयोग होतो.

**आधुनिक शास्त्रानुसार :** लवंगेमध्ये ऊर्जा, कार्बोहाइड्रेट्स, प्रथिने, जीवनसत्त्व 'अ', 'क' व 'ई', कॅल्शिअम, लोह, कॉपर, मॅग्नेशिअम, तंतुमय व पिष्टमय पदार्थ, सोडिअम, पोटॅशिअम ही घटकद्रव्ये असतात.

**उपयोग :** १) खोकला येत असेल. तर लवंग तोंडात चघळल्याने खोकल्याची ढास कमी होते. तसेच घशातील खवखव कमी होऊन खोकला दूर होण्यास मदत होते.

२) सर्दी-खोकला, घसा धरणे, आवाज बसणे अशा विकारांवर भाजलेली लवंग तोंडात ठेवून चघळल्यास घशाची सूज कमी होऊन आवाज मोकळा होतो.

३) वारंवार सर्दी होऊन नाकातून पाणी गळत असेल, तर अशा वेळी हातरुमालावर लवंगांचे तेल टाकून तो हुंगावा.

४) बारीक केलेल्या लवंगांचा लेप कपाळावर लावल्यास डोकेदुखी त्वरित थांबते.

५) लवंगांचे तेल कपाळावर चोळल्याने सुद्धा डोकेदुखी थांबते.

६) अपचन, गॅस यांमुळे होणारी पोटदुखी थांबविण्यासाठी पाव चमचा लवंगपूड आणि एक चमचा खडीसाखर एकत्रित करून दिवसातून दोन वेळा खावी.

७) तीव्र स्वरूपात दातदुखी जाणवत असेल, तर तत्काळ वेदना कमी करण्यासाठी लवंगांच्या तेलात भिजविलेला कापसाचा बोळा ठणकत असलेल्या दातावर घट्ट दाबून ठेवावा. याने दातदुखी त्वरित थांबते.

८) लवंग पाण्यात उकळून ते पाणी दिवसभर प्यायल्याने सर्दी-खोकला, अपचन, तोंडास दुर्गंधी येणे, भूक न लागणे हे विकार कमी होतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आजचा भारतीय उद्योग टाटा यांच्या योगदानातून

## अमोल घोलप यांचे प्रतिपादन



उद्योजक तसेच पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य अमोल घोलप बीबीए व बीबीए (आयबी) च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना. समवेत प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, प्रा. डॉ. मंगेश वाघमारे, डॉ. रघुनाथ सातपुते, प्रा. डॉ. सतीश जगताप.

नगर – न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज अहिल्यानगर येथील बीबीए व बीबीए (आय. बी) विभागाने भारतरत्न जे.आर.डी. टाटा यांची एकशे एकविसावी जयंती दरवर्षीप्रमाणे २९ जुलै रोजी साजरी केली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा सदस्य अमोल घोलप व निखिल उद्योग समूह अध्यक्ष डॉ. रघुनाथ सातपुते सीनियर मॅनेजर स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड अ. नगर, विभाग प्रमुख प्रा.डॉ. मंगेश वाघमारे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे हे होते.

प्रमुख पाहुणे अमोल घोलप यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःचा उद्योग उभा करून तो समाजाला उपयोगी कसा पडेल यासंबंधी मार्गदर्शन केले. छोट्या छोट्या कृतीतून नवीन संकल्पना अमलात आणाव्यात, कोणतेही काम मनापासून केले तर यश नक्कीच मिळते, सर्व विद्यार्थ्यांनी जे. आर. डी. टाटा यांचे आत्मचरित्र जरूर वाचावे असे आवाहन केले.

प्रमुख वक्ते डॉ. रघुनाथ सातपुते यांनी विद्यार्थ्यांना वाचन, चिंतन, मनन करण्यास सांगितले. उद्योग केवळ नफा मिळविण्यासाठी नव्हे तर समाजाच्या विकासासाठी उपयोगी आला पाहिजे हे जे. आर. डी. टाटांची तत्त्व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात आणावी, स्वतःची वेगळी ओळख निर्माण करून भावी आयुष्यात वाटचाल करावी असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी संस्थेची विचारधारा जे. आर. डी यांच्या विचारांशी जुळते, तसेच विद्यार्थ्यांनी वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी या तत्त्वांचा प्रगतीसाठी सुंदर ताळमेळ साधता येतो असे नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रा. डॉ. मंगेश वाघमारे यांनी केले. यात त्यांनी भारतीय उद्योगाचे जनक जमशेदजी टाटा, भारतरत्न जे. आर. डी टाटा व रतन टाटा यांच्या जीवन कार्याचा संक्षिप्त आढावा घेतला. तसेच त्यांनी भारतीय उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी केलेल्या विशेष योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यानिमित्त विभागामध्ये नुकतेच भारतरत्न जे. आर. डी टाटा पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट सेंटर सुरू करण्यात आले याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुणा कासार (तृतीय वर्ष बी.बी.ए), तसेच पाहुण्यांचे स्वागत व परिचय सुमित पुरोहित व अक्षता आढाव यांनी केला. आभार प्रदर्शन प्रा.डॉ. रूपाली घोरपडे यांनी केले. कार्यक्रमास प्रा.डॉ. सतीश जगताप, प्रा.डॉ. राहुल थोरात, प्रा.अभिजीत सातभाई, प्रा.अनिता पेटकर, प्रा. शामल जाधव, प्रा. नम्रता ठाकर तसेच बीबीए व बीबीए (आयबी) विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

# महात्मा फुले व अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाची कर्जमाफी करावी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन


महात्मा फुले व अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे कर्जमाफी करावी, या मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देण्यात आले.

नगर – महाराष्ट्रातील महार व नवबौध्द शेतकऱ्यांचे जमिनीवर इनाम वर्ग ६ ब वर्ग २ चा शेरा असल्याने त्या शेतकऱ्याला जमिनीच्या बाजार मूल्याचे ५०% रक्कम नजराणा भरल्याशिवाय बीन शेती करता येत नाही तसेच इनाम वर्ग ६ ब चा शेरा सातबारा उताऱ्यावर असल्याने शर्त भंग झाला म्हणून शासनाकडे जमीन वर्ग करण्याची अनेक प्रकरणे जिल्हाधिकारी स्तरावर न्यायप्रविष्ट आहेत. पूर्वी या समाजाला हडकी, हाडोळा, शीसवळा या नावाने वतने बहाल केली होती. ती वतने १९६० साली वतन कायद्याप्रमाणे बरखास्त करून शेतसाराचे ३ पट रक्कम भरून वर्ग २ करण्यात आली. वर्ग २ चे वर्ग १ करण्यासाठी जमिनीच्या बाजारमूल्याचे ५०% रक्कम भरण्याचा कायदा तो महाराष्ट्र इन्फेरियर व्हिलेज वतन अबोलिशन ॲक्ट १९५९ प्रमाणे करण्यात आला. त्यातील कलम ५ मधील तरतुदी वगळण्यात याव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे अशोक गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करताना केली.

याबाबत लवकरच महसूल मंत्री व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक मंत्रालयात घेण्याचे मान्य केले. सरकारने शेतकरी कर्ज मुक्तीचे धोरण घेतले. त्यात ज्या मागास वर्ग शेतकऱ्यांनी जिल्हा सहकारी बँकेकडून मध्यम मुदतीचे कर्जे घेतले ती मात्र कर्जमाफीमध्ये आलेली नाही. फक्त पीक कर्ज माफ झाले असुन त्याचा विचार करून ती कर्जे माफ करावीत याबाबतही चर्चा करून निवेदन देण्यात आले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा अहिल्यानगर शहरात उभारण्यात यावा


लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा अहिल्यानगरात उभारण्यात यावा, या मागणीचे निवेदन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देताना राजेंद्र घोरपडे.

नगर – मातंग समाजाच्या अस्मितेचे प्रतीक आणि वंचित, शोषित, पीडित जनतेचे आवाज ठरलेले लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी व्हावी, यासाठी भारतीय जनता पार्टी दलित आघाडी, अहिल्यानगर शहराच्या वतीने अध्यक्ष सरचिटणीस राजेंद्र लक्ष्मण घोरपडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्याकडे या मागणीचे निवेदन देत पुतळ्याच्या उभारणीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. यावेळी बी.जे.पी.अनुसुचित जातीचे उपाध्यक्ष सुनिल सकट, राष्ट्रवादी शहर उपाध्यक्षा शितल गाडे, राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष सुनिता कांबळे, सामाजिक न्याय शहर उपाध्यक्ष येशुदास वाघमारे, येशुदास विठ्ठल उमाप, पोपट पाथरे, पांडुरंग घोरपडे, अशोक भोसले, सागर रोकडे, सनी कांबळे, येशुदास भारस्कर आदी उपस्थित होते.

घोरपडे यांनी निवेदनात स्पष्ट केले की, अहिल्यानगरसह संपूर्ण महाराष्ट्रात मातंग समाजाच्या हक्कांसाठी आणि सांस्कृतिक जागृतीसाठी अण्णाभाऊ साठे यांनी प्रचंड कार्य केले. त्यांचे विचार, कथा आणि लोकशाहीराची ताकद आजही समाजाला दिशा देतात. त्यामुळे शहरात त्यांच्या स्मृती जपणारा आणि पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देणारा पूर्णाकृती पुतळा उभा राहणे अत्यंत आवश्यक आहे.

मातंग समाजातील नागरिक अनेक वर्षांपासून ही मागणी सातत्याने करत आहेत. वेगवेगळ्या सामाजिक संस्थांनी, संघटनांनी, तसेच कार्यकर्त्यांनी ही मागणी प्रशासनापर्यंत पोहोचवली होती. मात्र अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने समाजात असंतोष व्यक्त होत आहे. त्यामुळे आता लवकरात लवकर पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी होत आहे.

या संदर्भात घोरपडे म्हणाले, अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आणि लोकशाहीर म्हणूनचे योगदान हे केवळ मातंग समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचा अमूल्य ठेवा आहे. त्यांचा पुतळा अहिल्यानगरात उभारल्यास ही भूमी समाज परिवर्तनाचे व प्रेरणेचे केंद्र ठरेल.

अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी झाल्यास शहरात सांस्कृतिक वारसा जपणारी आणखी एक ओळख निर्माण होईल, तसेच मातंग समाजाच्याच नव्हे तर सर्वच समाज– घटकांच्या भावना अधिक दृढ होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



श्येडुल्ड बँकेचा दर्जा मिळाल्याबद्दल अहमदनगर मर्चंटस बँकेचा विशेष सन्मान करण्यात आला.

# शेड्युल्ड बँकेचा दर्जा मिळाल्याबद्दल 'अहमदनगर मर्चंटस्'चा विशेष सन्मान

नगर – अहमदनगर मर्चंट्स को–ऑप. बँकेला रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून शेड्युल्ड बँकेचा दर्जा मिळाल्याबद्दल नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक्स अॅण्ड क्रेडिट सोसायटीज लिमिटेड, नवी दिल्ली यांच्या संचालक मंडळाच्या वतीने पुणे येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. देशभरातील विविध सहकारी बँकांचा सहभाग असलेल्या या सोहळ्यात अहमदनगर येथील या बँकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

या गोरवास्पद सोहळ्यावेळी अहमदनगर मर्चंट्स को–ऑप. बँकेचे संस्थापक व चेअरमन हस्तीमल मुनोत, व्हॉईस चेअरमन अमित मुथा, संचालक सी.ए., आय.पी. अजय मुथा, किशोर मुनोत, संचालिका श्रीमती मीनाताई मुनोत, श्रीमती प्रमिलाबाई बोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील पुराणिक उपस्थित होते.

बँकेला मिळालेला हा 'शेड्युल्ड बँक' दर्जा, त्यांच्या गेल्या अनेक वर्षांच्या अथक परिश्रमाचे आणि उत्कृष्ट कार्यप्रणालीचे प्रतीक आहे. नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटीज लिमिटेड द्वारे मिळालेला हा सन्मान, बँकेच्या कार्याला आणि ग्राहकसेवेला मिळालेली एक मोठी पोचपावती आहे. यामुळे अहमदनगर मर्चंट्स को–ऑप. बँकेची विश्वासार्हता आणि कार्यक्षमता आणखी वाढण्यास मदत होईल.

# प्रा. प्रतिभा गायके यांना पीएच.डी. पदवी प्रदान



नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. प्रतिभा शशिकांत गायके यांना इंदोर येथील ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यापीठाची पीएच. डी. पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली. प्रा. गायके यांनी कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनिअरिंग क्षेत्रातील 'फेस अॅन्टी स्युफींग युजींग सी. एन. एन. क्लासिफायर अॅण्ड फेस लाईव्हनेस डिटेक्शन युजींग व्हेरीयस इमेज प्रोसेसिंग अॅण्ड मशिन लर्निंग टेक्नीक्स' या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ. अजय रवंदले (एपीजे अब्दुल कलाम विद्यापीठ, इंदोर) यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. गायके यांनी इंटरनॅशनल स्कोपस या जर्नल्समध्ये १४ पेपर सादर केले. तसेच नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे ७ पेपर सादर झाले आहेत.

पीएच. डी. मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, सचिव डॉ. पी.एम. गायकवाड, संचालक सुनिल कल्हापुरे व प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, आयटी डिपार्टमेंटचें हेड डॉ. दीपक विधाते आदींसह प्राध्यापकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


पद्मशाली सोशल फाउंडेशनतर्फे शहरातील विविध शाळांमधील ११८ गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

# पद्मशाली सोशल फाउंडेशनतर्फे गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

नगर – पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय संकुल येथे आयोजित कार्यक्रमात अहिल्यानगर शहरातील विविध शाळांमधील ११८ गरजू विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष गणेश लकशेट्टी, इंजि.अक्षय बल्लाळ, अजय लयचेट्टी, श्रीनिवास बुरगुल, रोहित गुंडू, शुभम सुंकी, राजेंद्र बुलबुले, गणेश अवधूत, बालाजी कोक्कुल, वरद लकशेट्टी, बालाजी रायपेल्ली, ओंकार आडेप, अनिकेत दुस्सा, ओंकार जेटला आदी उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत श्री मार्कंडेय विद्यालय, वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा, १०८ महंत सुचासिंगजी माध्यमिक विद्यालय, पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालय, बालक मंदिर प्राथमिक शाळा, महात्मा फुले विद्यालय, सिताराम सारडा विद्यालय, मनोहरलाल रामचंद्र सबलोक विद्यालय, दादा चौधरी मराठी शाळा अशा विविध शाळांमधील ११८ गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी प्रशांत कोक्कुल, ओंकार रायपेल्ली आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित गुंडू यांनी केले तर गणेश अवधुत यांनी आभार मानले.

# संस्थापकाची पुण्याई प्रेरणादायी


निखिल राठोड

नगर – एखादा व्यवसाय सलग ५० वर्ष यशस्वीरित्या चालू राहणे ही मोठी अभिमानाची बाब असून त्याकरता संस्थापकाने घेतलेले कष्ट त्यांची पुण्याई व आशीर्वाद आमच्यासाठी प्रेरणादायी असल्याची माहिती न्यू प्रभात फ्रुट्सचे संचालक निखिल नरेंद्र राठोड यांनी दिली.

आजोबा शिवशंकर राठोड यांनी पन्नास वर्षांपूर्वी प्रतिकूल परिस्थितीत न्यू प्रभात बेकरीची स्थापना करून बेकरी व्यवसायाची मुहूर्तमेढ रचली होती. या छोट्याशा व्यवसायाचे रूपांतर त्यांचे चिरंजीव संजय, महेंद्र व नरेंद्र राठोड यांनी मोठे जिद्दीने पुढे चालवला आणि तोच वसा त्यांच्या नातवांनी म्हणजे आम्ही सर्वांनी घेतला आहे. बेकरी व्यवसायात नवनवीन पदार्थ ग्राहकांना स्वादिष्ट, पौष्टिक देण्याचा प्रयत्न आम्ही न्यू प्रभात फ्रुट्स च्या माध्यमातून करत आहोत. ग्राहकांच्या पसंतीस असलेले अनेक बेकरी उत्पादने आमच्या दालनात उपलब्ध असल्याचे निखिल राठोड यांनी सांगितले. यामध्ये मसाला मेथी, खाकरा, अनुबन मावा टोस्ट, हॉलवेट गव्हाची खारी टोस्ट, खुसखुशीत बटन खारी, पिवर व्हेज आईसकेक, चॉकलेट डोनट, करमेल खारी, कुरकुरीत जीरा बटर, क्रीम रोल, पनीर पॅटीस, व्हेजिटेबल पॅटीस, प्युअर व्हेज पॅटीस, पावलादी, पावभाजी करता स्पेशल बनवलेले पाव, अशा अनेक प्रकारचे उत्पादने आम्ही तयार करत असल्याचे निखिल राठोड यांनी सांगितले

शुद्ध शाकाहारी केक आमच्याकडे तयार होत असून घरगुती प्रमाणे मोठ्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी ग्राहकांच्या मागणीनुसार केक तयार करून दिला जातो. अनेक ग्राहक आम्ही तयार केलेल्या शुद्ध शाकाहारी आईस केकचे चाहते, अजून समाधानी आहेत. एकदा केक घेऊन गेल्यानंतर दरवर्षी आमच्याकडून केक तयार करून घेणारे अनेक ग्राहक आमच्या शोरूमशी संलग्न झालेले आहेत. ग्राहकांचा विश्वास हीच आमच्या व्यवसायाची खरी ओळख असल्याचे निखिल राठोड यांनी अभिमानाने सांगितले ग्राहक समाधानी तर आम्ही समाधानी आहोत आमच्या येथे तयार झालेले पनीर पॅटीस या उत्पादनास मोठी मागणी आहे.


नाना पाटील वस्ताद तालीम नूतनीकरणाचा व व्यायाम शाळेचा शुभारंभ करताना आमदार संग्राम जगताप.

# नाना पाटील वस्ताद तालीम नूतनीकरणाचा व व्यायामशाळेचा शुभारंभ

नगर – नाना पाटील वस्ताद तालीम नूतनीकरण व व्यायामशाळेचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी संजय शेंडगे, गणेश कवडे, गणेश भोसले, दगडू मामा पवार, संजय शेंडगे, अनिल बोरुडे, श्याम नळकांडे, सचिन शिंदे, बाबु टायरवाले, दत्ता जाधव, दत्तात्रय मुदगल, प्रशांत गायकवाड, संतोष गेनप्पा, सुरेश तिवारी, अशोक दहिफळे, अरविंद शिंदे, महेश लोंढे, प्रकाश सैंदर, गणेश वामन, दिपक खैरे, काका शेळके, दिपक सुळ, बाप्पु शेळके, बजरंग महाराज शेळके उपस्थित होते.

तसेच यावेळी शहरातील विविध जुन्या नामवंत पहिलवानांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी रमेश शेळके, अनिल म्हस्के, मनोहर शिंदे, अनिल कवडे, शिवाजीराव कराळे, संभाजीराव लोंढे, मारुतीराव खंडागळे, राम नळकांडे, विजय चितळे, मनोज लांडे, गणेश साळुंके, सुनिल चितळे, बाबासाहेब मुदगल, आप्पा वाघमारे, गोवर्धन नळकांडे, कानिफनाथ शिंदे, अनिल नागवडे, अनिल वाणे, भैय्या रोहोकले, रघुनाथ लांडे, अमोल सुरसे, बाळू शेळके, राधेशाम धूत, ईश्वर शेळके, राजेंद्र कवडे, गंगाधर जाधव, विशाल वाघ, अर्जुन रोहोकले, शंकर ठाणगे, राजेश म्हस्के, अमर शिंदे, महेंद्र शिरसाठ, मिलिंद जपे, पै. शिवाजी शिर्के, पै. अनिल गुंजाळ, संजय कवडे, अंबादास वाघ, राहुल कवडे, भरत शेळके, राहुल लांडे, दिपक चत्तर, नितीन रोहोकले, रामा वाघ, बालू काळे, किशोर वाघ, संजय साठे, ओंकार कवडे, पै. काशिद, दिनकरराव देवतरसे, उमेश खिंदारे, गणेश हाडोळे, भिम वाकळे, शिवा अनभुले, किशोर देवकर, सागर देवकर आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन राधेशाम धुत यांनी केले. अमोल सुरसे यांनी आभार मानले.

# आजचा विद्यार्थी हा उद्याचा नेता, शास्त्रज्ञ, अधिकारी, समाजसेवक व नवकल्पनांचा वाहक : शबनम गुरग

## अहमदनगर महाविद्यालयात 'महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेन्ट २०४७' स्पर्धा उत्साहात


अहमदनगर महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेन्ट २०४७ अंतर्गत लोगो निर्मिती व घोषवाक्य स्पर्धा प्रभारी प्राचार्य नोएल पारगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. शबनम गुरग.

नगर – आज तुम्ही 'व्हिजन डॉक्युमेन्ट स्पर्धेत' भाग घेत आहात, ही एक संधी आहे – तुमच्या विचारांना, कल्पनाशक्तीला आणि दूरदृष्टीला लेखनाच्या माध्यमातून आकार देण्याची. व्हिजन डॉक्युमेन्ट म्हणजे फक्त एक लेख नाही, तर तो आहे तुमचा देश, समाज, शिक्षण, विज्ञान, पर्यावरण किंवा भविष्यातील तुमच्या क्षेत्राविषयीचा दृष्टीकोन. तुमचे विचार हेच उद्याचे निर्णय असू शकतात, कारण आजचा विद्यार्थी हा उद्याचा नेता, शास्त्रज्ञ, अधिकारी, समाजसेवक आणि नवकल्पनांचा वाहक आहे, असे प्रतिपादन प्रा.डॉ.शबनम गुरग यांनी केले.

अहमदनगर महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेन्ट २०४७ अंतर्गत लोगो निर्मिती व घोषवाक्य स्पर्धा प्रभारी प्राचार्य नोएल पारगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कृषि, शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास, नगरविकास, भूसंपादन, जलसंपादन, पाणी, पायाभूत सुविधा, वृत्त, उद्योग, सेवा, सामाजिक विकास, सुरक्षा, सॉफ्ट पॉवर, तंत्रज्ञान, मानव विकास व मनुष्यबळ व्यवस्थापन या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी लोगो व घोषवाक्य निर्मितीसाठी सदर कार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

प्रा.डॉ.शबनम गुरग पुढे म्हणाल्या, विचार स्पष्ट, रचनाबद्ध आणि वास्तवाशी जोडलेले असावेत. समस्या ओळखा, संधी शोधा आणि उपाय सुचवा. जे करून आपण उद्याचे चांगले नागरिक होऊ शकतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. भागवत परकाळ यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शबनम गुरग होत्या.

स्लोगन स्पर्धेत बागवान फरिहा समीर हिने प्रथम क्रमांक मिळवला. शिंदे पूजा प्रवीण हिने द्वितीय तर हीणडगे आश्लेषा दत्तात्रेय दरेकर हिने तृतीय क्रमांक पटकावला. लोगो स्पर्धेत तनुजा रामदास हिने प्रथम, समृद्धी घोरपडे हिने द्वितीय तर श्रेया अनंत गुरुंग हिने तृतीय क्रमांक पटकावला.

या कार्यक्रमाच्या नियोजन समितीत प्रा. डॉ. पराग आठवले (कला शाखा), प्रा. डॉ. शबनम गुरंग (वाणिज्य विभाग), डॉ. विठ्ठल कवडे (रसायनशास्त्र विभाग), प्रा. फरीन खान (संगणकशास्त्र विभाग) आणि प्रा. हरिता गांधी (बी.बी.ए. विभाग) यांनी महत्त्वपूर्ण काम पहिले. आभार प्रदर्शन प्रा. हरिता गांधी (बी.बी.ए. विभाग) यांनी केले. परीक्षक म्हणून डॉ. प्रकाश सूर्यवंशी यांनी काम पहिले.

कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, कायम विना अनुदान विभाग प्रमुख डॉ. सय्यद रज्जाक, उपप्राचार्य डॉ. प्रितमकुमार बेदरकर आणि श्रीमती काल्पलता भिंगारदिवे यांचे सहकार्य लाभले.

# नवीन पिढीची श्रवणयंत्रे
## ऐकण्याच्या समस्यांवर एक स्मार्ट उपाय

आधुनिक युगात वाढत्या प्रदूषणामुळे लोकांच्या श्रवणशक्तीवर परिणाम होऊ लागला आहे. वाढते वय हे ऐकू कमी येण्याचे एक प्रमुख कारण बनले आहे. ऐकू कमी आल्यामुळे लोकांना एकटेपणा, संवादहीनता, टिनिटस (कानामध्ये आवाज येणे) आणि काही प्रकरणांमध्ये स्मृतिभ्रंश (Dementia) यांसारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. आयुष्यातील संवाद कमी झाल्याने आणि आवाजांच्या दुनियेपासून दूर गेल्याने, अनेकांच्या जीवनात एक प्रकारची पोकळी निर्माण होते, ज्यामुळे त्यांचे मानसिक आरोग्यही प्रभावित होते.

या श्रवणदोषावर मात करण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त, कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित श्रवणयंत्रे (Hearing Aids) आज एक वरदान ठरत आहेत. ही केवळ ऐकण्याची साधने नाहीत, तर ती तुमच्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनतात. आधुनिक पिढीतील श्रवणयंत्रे तुमच्या गरजा आणि जीवनशैलीनुसार विशेषतः प्रोग्राम केलेली (योजिलेली) आणि डिझाइन केलेली (रचलेली) असतात, ज्यामुळे तुम्हाला ऐकण्याचा सर्वोत्तम अनुभव मिळतो आणि जीवनातील हरवलेले आवाज, मग ते मुलांचे हसणे असो, पक्षांचा किलबिलाट असो, किंवा प्रियजनांचा संवाद असो, ते परत मिळतात. कल्पना करा, जेव्हा तुम्ही एखाद्या गर्दीच्या ठिकाणी असाल, तेव्हा ही यंत्रे अनावश्यक आवाज गाळून तुम्हाला फक्त महत्त्वाच्या गोष्टी ऐकू येण्यास मदत करतात.

डिजिटल श्रवणयंत्र जेव्हा अनुभवी ऑडिओलॉजिस्टद्वारे (Audiologist) तुमच्या ऑडिओमेट्री चाचणीनुसार (Audiometry Test) काळजीपूर्वक प्रोग्राम केले जाते, तेव्हा ते तुम्हाला कोणत्याही विकृतीशिवाय (distortion) उत्तम श्रवणशक्ती मिळवून देते. यामुळे तुम्हाला उत्तम स्पष्ट (crystal clear) ऐकू येते. हे केवळ तंत्रज्ञान नाही, तर मानवी स्पर्शाने युक्त एक वैयक्तिक उपाय आहे, जो तुमच्यासाठी खास तयार केला जातो.

आजकालच्या श्रवणयंत्रांमध्ये अनेक आकर्षक वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत, जी तुमच्या जीवनशैलीला परिपूर्ण बनवतात. यामध्ये रिचार्जेबल (पुन्हा चार्ज होणारे) बॅटऱ्या, स्मार्टफोनशी जोडणीसाठी मोबाइल कनेक्टिव्हिटी, पूर्णपणे अदृश्य होणारी लहान अदृश्य श्रवणयंत्रे, टिनिटस मास्कर (कानातील आवाज कमी करणारे) आणि टीव्हीचा आवाज थेट तुमच्या कानात पोहोचवणारे टीव्ही स्ट्रीमर यांचा समावेश आहे. ही वैशिष्ट्ये केवळ सोयीसाठी नाहीत, तर ती तुम्हाला अधिक सक्रिय आणि समाधानी जीवन जगण्यास मदत करतात. कल्पना करा, तुमच्या आवडीचा टीव्ही कार्यक्रम पाहताना किंवा फोनवर बोलताना प्रत्येक शब्द स्पष्टपणे ऐकू येणे किती समाधानकारक असू शकते!

शिवाय, प्रगत श्रवण चाचणी तंत्रांनीही आज मोठी प्रगती केली आहे. या अत्याधुनिक चाचण्यांमुळे तुमच्या श्रवणशक्तीचे सखोल निदान करणे शक्य झाले आहे. लहानात लहान श्रवण समस्याही अचूकपणे ओळखल्या जातात आणि त्यावर योग्य उपाययोजना केली जाते. यामुळे ऑडिटरी डिप्राइव्हेशन (Auditory Deprivation) म्हणजेच कानाला आवश्यक ते आवाज न मिळाल्याने होणारे नुकसान टाळता येते. वेळेवर निदान आणि उपचार केल्यास, श्रवणशक्ती गमावण्याचे धोके टाळता येतात आणि आयुष्यातील अनेक आनंददायी क्षण पुन्हा अनुभवता येतात. त्यामुळे, जर तुम्हाला किंवा तुमच्या जवळच्या कोणाला श्रवणविषयक काही समस्या जाणवत असतील, तर आजच एका ऑडिओलॉजिस्टचा सल्ला घ्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घ्या.

**– नितंत केवळ,**
**ऑडिओलॉजिस्ट** BSLP (पुणे)
PG **श्रवण आणि संतुलन (इंग्लंड)**
मोबा. ८३८००४१२४०

# रेव्हेन्यू अ‍ॅण्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंटस् गर्व्हमेंट सर्व्हटस् को-ऑप. क्रेडिट सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत



रेव्हेन्यू अ‍ॅण्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंटस् गर्व्हमेंट सर्व्हटस् को-ऑप. क्रेडिट सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत पार पडली.

नगर – रेव्हेन्यू अ‍ॅण्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंटस् गर्व्हमेंट सर्व्हटस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहिल्यानगर या संस्थेची सन २०२४ – २५ ची १०४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन संतोष मांडगे यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील नेहरु सभागृहात पार पडली. यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन गणेश गर्कळ, संचालक संदिप तरटे, सुरेश राऊत, राजेश घोरपडे, बाबासाहेब दातखिळे, प्रविण बोरुडे, प्रदिप चव्हाण, हरिभाऊ सानप, विजय हरिश्चंद्रे, प्रदिप अवचर, वृषाली करोसिया, सुनंदा मरकड, सनी जाधव, विकास मोराळे, संतोष ताठे व जनरल सेक्रेटरी बाबासाहेब पालवे उपस्थित होते.

सभेची सुरुवात संस्थेचे सभासद गणेश नरोटे यांच्या मुली श्रावणी, श्रेयशी व शर्वरी नरोटे यांच्या स्वागत गिताने झाली.

सभेमध्ये सभासदांना सन २०२४ – २५ सालासाठी दिलेल्या ८ % वर्गणी व्याजास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. या सभेमध्ये सभासदांनी उपविधी दुरुस्तीसाठी मान्यता दिली. मयत सभासदांचे वारसांसाठी मदत ६ लाख रुपयांवरुन ७ लाख करणेत आली, सभासद कन्यादानाची रक्कम रु.११,०००/- वरुन रु.२१,०००/- करणेत आली. सभासदांचे कॅन्सर, बायपास सर्जरी व डायलेसीस होत असलेस अशा आजारपणांसाठी रु. ५१,०००/- ची मदत देण्यासाठी चेअरमन फंडाची निर्मीती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.


संस्था सभासदांना २५ लाख रुपयांपर्यंत ८.२५ % या अल्प दराने त्वरीत कर्ज वाटप करत असून सभासदांचे वर्गणी ठेवीवर ८ % दराने व्याज दिले आहे. संस्थेने सभासदांना १ वर्ष सेवा पूर्ण झालेस ३० पट कर्ज देण्याची मर्यादा केल्याने यावर्षी संस्थेच्या खेळत्या भांडवलात रु. १० कोटीने वाढ झाली आहे. तसेच सभासदांचा प्रत्येकी रुपये १५ लाखांचा विमा उतरविलेची माहीती सभेचे अध्यक्ष संतोष मांडगे यांनी दिली.

सभेमध्ये चेअरमन, व्हा. चेअरमन व संचालक मंडळाचे हस्ते सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा ट्रॉफी व बक्षिसाची रक्कम देवून तसेच सेवानिवृत्त सभासदांचा शाल, श्रीफळ देवून सत्कार करणेत तसेच राज्य शासनाने क्यू आर कोड वाचनालयाबद्दल गौरवान्वित केलेले मंडळाधिकारी मोहसीन शेख व अहिल्यानगर जिल्हा आदर्श तलाठी पुरस्कार मिळविणारे मंगेश फापाळे यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी सर्व विभागांच्या संघटनांचे पदाधिकारी संतोष तनपुरे, गणेश जाधव, राजेंद्र आंधळे, प्रशांत हासे, रवि डिक्रुज, राहुल मापारी, डॉ. मुकुंद शिंदे यांचा सत्कार करणेत आला.

या सभेमध्ये सर्व सभासदांनी हिरीरीने भाग घेतला. चेअरमन व व्हा. चेअरमन यांनी सर्व सभासदांचे आभार व्यक्त केले. सभेचे सुत्रसंचालन प्रसन्ना पाठक यांनी केले. दरवर्षी प्रमाणेच आजची सभाही खेळीमेळीचे वातावरणात पार पडली.

# आंतरराष्ट्रीय मैत्रीचे नवे पाऊल; स्पेनमधील विद्यार्थ्यांचे श्रीरामकृष्णमध्ये आगमन




सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्पेनमधील मॅन्युअल ग्राफिक डिझायनर, मार्ता वैद्यकीय पदवीच्या तिसऱ्या वर्षाला शिक्षण घेत असलेल्या या दोघांनी विद्यालयाला भेट दिली.

नगर – युवा आदान प्रदान या कार्यक्रमांतर्गत श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्पेनमधील मॅन्युअल ग्राफिक डिझायनर, मार्ता वैद्यकीय पदवीच्या तिसऱ्या वर्षाला शिक्षण घेत असलेल्या या दोघांनी विद्यालयाला भेट दिली. यावेळी शालेय समितीचे चेअरमन व संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार झंवर यांनी मार्ता ब्रायोनेस पेना यांचा सत्कार केला. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना यांनी मॅन्युयल प्रोर्टर्सायो राद्रीग्ज यांचा सत्कार केला. तसेच लायन्स क्लबचे अध्यक्ष श्री. झालानी, लायन्स क्लबचे सचिव सनी वाधवा, लिओ क्लबचे अध्यक्ष चिरंजीव गुरुनूर सिंग वाधवा व संस्थेचे उपसचिव बजरंग दरक यांचा सत्कार विद्यार्थी प्रतिनिधींनी केला.


यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांना आपल्या भारतीय संस्कृतीचे प्रतीक असणारे भरत नाट्यम हे नृत्य दाखविले. तसेच श्रीराम व कृष्ण यांचा महिमा सांगणाऱ्या भजनाचे सादरीकरण करण्यात आले. त्याचबरोबर सूर्यनमस्कार योगासने यांची प्रात्यक्षिकेही दाखविण्यात आली.

त्यानंतर इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी मुलाखतीद्वारे त्यांच्याशी संवाद साधून त्यांना आपला भारत, भारताची संस्कृती कशी वाटली यावर प्रश्न विचारले. त्यांना आपली भारतीय संस्कृती अतिशय आवडली तसेच यामधून काहीतरी घेण्यासारखे आहे असे त्यांना भारतीय लोकांचा नम्रपणा अतिशय आवडला व त्यांनी सांगितले की भारतीय लोकांची साधी राहणे आणि उच्च विचारसरणी आहे, असे त्यांनी मुलाखती दरम्यान सांगितले.

त्यांनी त्यांच्या मनोगतात सांगितले की त्यांना भारतीय संस्कृती आवडली त्याचबरोबर औरंगाबाद येथील वेरूळ अजिंठा येथील लेणी ते पाहून आले त्याबद्दल त्यांनी सांगितले. यावेळी विद्यालयातील चित्रकला शिक्षिका सौ. पूजा म्हस्के इयत्ता सातवी मधील श्रुती रासने यांनी हाताने काढलेले राधा कृष्णाचे चित्र यावेळी त्यांना भेट स्वरूपात देण्यात आले.

प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर, कनिष्ठ म हाविद्यालयाच्या उपप्राचार्या संपदा देशपांडे, विद्यालयाच्या उप प्राचार्या सौ. गगन वाधवा, पर्यवेक्षक सुषमा उजागरे उपस्थित होते. सूत्रसंचालन पूर्व प्राथमिक वर्गाचे व प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक श्रेयकुमार गुंडू यांनी केले.

# अहिल्यानगर ते पंढरपूर २०० किमी सायकल प्रवास एका दिवसात पूर्ण



राजेंद्रकुमार नाईकवाडी यांनी एक प्रेरणादायी कामगिरी करत अहिल्यनगर ते पंढरपूर हे सुमारे २०० किलोमीटरचे अंतर सायकलवरून एका दिवसात पूर्ण केले.

नगर – श्नायडर इलेक्ट्रिकचे जनरल मॅनेजर राजेंद्रकुमार नाईकवाडी यांनी एक प्रेरणादायी कामगिरी करत अहिल्यनगर ते पंढरपूर हे सुमारे २०० किलोमीटरचे अंतर सायकलवरून एका दिवसात पूर्ण केले.

या अद्वितीय प्रवासात त्यांनी केवळ शारीरिक क्षमतेचेच नव्हे, तर मानसिक ताकदीचेही दर्शन घडवले. पंढरपूरच्या वारीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा प्रवास पूर्ण करत एक सामाजिक आणि आरोग्यदायी संदेश दिला आहे.

प्रवासाचे वैशिष्ट्ये: एकूण अंतर : २०० किमी, प्रारंभ बिंदू: अहिल्यनगर, समाप्ती बिंदू: पंढरपूर, एकाच दिवसात पूर्ण, उद्देश: आरोग्य, फिटनेस आणि प्रेरणा श्री. नाईकवाडी यांची ही कामगिरी कंपनीतील सहकाऱ्यांसाठी आणि समाजासाठी एक प्रेरणास्त्रोत ठरत आहे.

# योगी गेंडानाथजी महाराज पुण्यस्मरणार्थ १६ ऑगस्टला अहिल्यानगरमध्ये 'जिल्हास्तरीय भक्तिगीत गायन स्पर्धा'



नगर – नगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे महंत योगी गेंडानाथजी महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त शहरात स्वरबहार फाऊंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय भक्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १० ते १६ (लहान गट) व १६ पासून पुढे (मोठा गट) अशा २ वयोगटात या स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. १६ ऑगस्ट रोजी अहिल्यानगरमध्ये टिळक रोडवर असलेल्या लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे या स्पर्धा होणार असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र टाक यांनी कळविले आहे.

सकाळी ९:०० वा. या स्पर्धेस प्रारंभ होईल. पहिल्या सत्रात लहान गट तर दुपार नंतरच्या सत्रात मोठ्या गटाच्या स्पर्धा घेतल्या जातील. सायंकाळी लगेचच पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. सहभागी स्पर्धक वादक शिक्षक पालक याकरिता दुपारी प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. लहान गटामध्ये अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाकरिता रू. २००१, १५०१ ,१००१, तर रू. २५१ रुपयांची उत्तेजनार्थ २ पारितोषिके दिली जाणार आहेत, तर मोठ्या गटाकरिता प्रथम क्रमांकाकरिता रू. ५१००, द्वितीय क्रमांक रू. ३१००, तृतीय क्रमांक रू. २१०० रोख व स्मृतीचिन्ह तर ५०० रुपयांची २ उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत.

विजेत्यांना स्मृतिचिन्ह तर स्पर्धेतील प्रत्येक सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्र दिले जाणार आहे. मोठ्या गटाकरिता रू. ५००, तर लहान गटाकरिता रू. २०० इतकी प्रवेश फी आकारण्यात येणार असून स्पर्धकाने वैयक्तिकरित्या अभंग, भक्तिगीत, गवळण, हिंदी भजन आदी गीतप्रकारातील कुठलेही १ गीत सादर करावयाचे आहे. सादरीकरणासाठी एकूण ५ मिनिटे एवढा अवधी दिला जाणार आहे. साथसंगत सोबत आणल्यास उत्तम. नसल्यास संयोजकांच्या वतीने वाद्य आणि वादकांची व्यवस्था करण्यात आली आहे.

स्पर्धेकरिताचे प्रवेश अर्ज आर. टी. स्टुडिओ, कैलास टॉवर, आझाद चौक, घुमरे गल्ली, अहिल्यानगर येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीकरिता राजेंद्र टाक, मोबाईल ९४२२२२०८७५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात वाणिज्य विभागाचे 'अकाऊंटिंग म्युझियम'चे उद्घाटन



न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात वाणिज्य विभागाचे 'अकाऊंटिंग म्युझियम' चे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्या हस्ते झाले.

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागात स्थापन केलेल्या 'अकाऊंटिंग म्युझियम'चे उद्घाटन उत्साहात पार पडले. वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल, मुंबई आणि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया (अहिल्यानगर शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या म्युझियमचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्या हस्ते झाले. वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल मुंबईचे अध्यक्ष सीए केतन सैया हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच संस्थेचे सचिव ज्येष्ठ विधीज्ञ विश्वासराव आठरे पाटील व सहसचिव जयंत वाघ यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना गौरवशाली भारतीय ज्ञानपरंपरेची ओळख करून देणे आणि अकाऊंट विषयातील काळानुरूप झालेले बदल समजून घेण्यासाठी हे म्युझियम उपयुक्त ठरेल, असे ते म्हणाले.

सीए केतन सैया यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, चार्टर्ड अकाऊंटंट या क्षेत्राकडे अनेक विद्यार्थी आकर्षित होत आहेत. वाणिज्य शाखेतून नोकरी आणि व्यवसायाच्या प्रचंड संधी उपलब्ध होत असल्यामुळे एकही विद्यार्थी बेरोजगार राहणार नाही. सीए इन्स्टिट्यूट विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध उपक्रम, शिष्यवृत्ती योजना आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबवत आहे.

संस्थेचे सचिव विश्वासराव आठरे पाटील यांनी संस्थेचा गौरवशाली इतिहास सांगितला. विद्यार्थ्यांच्या हितासाठी महाविद्यालय आणि इन्स्टिट्यूट अशा दोन्ही संस्था सातत्याने काम करत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात रामचंद्र दरे म्हणाले, प्राचीन काळापासून व्यवहाराच्या पद्धती बदलत आल्या आहेत. अकाऊंटन्सीतील हे बदल, जुनी नाणी, चलन, पदके, जुने ताळेबंद, धनादेश, खातेपुस्तिका यांसारख्या अकाऊंटन्सी संबंधी वस्तू एकाच छताखाली पाहण्याची आणि अभ्यासण्याची संधी या म्युझियममुळे विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्यांनी महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या हितासाठी राबवत असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुकही केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ. एस. बी. कळमकर, सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



अ. नगर कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने हिंदुत्व प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने निकाली कुस्तींचे मैदानाचे आयोजन करण्यात आले होते.

## हिंदुत्व युवा प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्यावतीने निकाली कुस्ती स्पर्धेत

# पै.महेंद्र गायकवाड ठरला चांदीची गदाचा मानकरी

नगर – हिंदुत्व युवा प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने नागपंचमीनिमित्त निकाली कुस्तींचे आयोजन करण्यात आले आहे.

वारुळाचा मारुती येथे अ. नगर कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने हिंदुत्व प्रतिष्ठान व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने निकाली कुस्तींचे मैदानाचे आयोजन केले होते. यावेळी डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, पै.संभाजी लोंढे, महाराष्ट्र केसरी गुलाब बर्डे, अशोक शिर्के, उत्तर महाराष्ट्र केसरी पै.अनिल गुंजाळ, गणेश कवडे, अनिल बोरुडे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, पै.गणेश वामन, दत्ता मुदगल, अजय चितळे, पै.राम नळकांडे, निखिल वारे, आप्पा दातरंगे, उत्तर महाराष्ट्र केसरी पै.युवराज करंजुले, पै.महेश लोंढे, पै.संजय शेळके, पै.गोरख खंडागळे, पै.दादा पांडुळे, सारंग वाघ, अशोक घोडके, युवराज शिंदे, पै.दिनेश लोंढे, वैभव वाघ, राम वाघ, गोरख गोरे, पै.सुनिल कदम, पै.बजरंग शेळके, गणेश दातरंगे, पै.विजय लांडे, पै.संतोष लांडे, पै.दत्ता ठाणगे, पै.बाळासाहेब भापकर, म्हस्के वस्ताद, पै.मिलिंद जपे, अभिजित बोरुडे, राजेंद्र शिंदे, शिवा वाघ, मारुती खंडागळे, हरीभाऊ येलदंडी, सागर कदम उपस्थित होते. पै.महेंद्र गायकवाड याने हरियाणा केसरी बंटीकुमार याला पराभूत करून चांदीची गदा पटकावली. पारीतोषिक रोख रक्कम ३ लाख रुपये व चांदीची गदा पै.महेंद्र गायकवाड यांना देण्यात आली.

स्पर्धेला डबल उप महाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड, हरियाणा केसरी बंटी कुमार, डबल महाराष्ट्र चॅम्पियन, पै.ऋषिकेश लांडे, महाराष्ट्र चॅम्पियन पै.अण्णा गायकवाड, पै.अक्षय पवार, पै.लक्ष्मण भागवत, पै. मनोज फुले, पै.विजय पवार, पै.तुषार अरुण, पै.अनिल ब्राह्मणे, पै.पप्पू घोडके, पै.प्रतीक जगदाळे, पै. ओम खंडागळे, पै.शुभम पाचैरे, पै.राज वामन, पै.पोपट वरडळे, पै.शुभम लोंढे, पै.आकाश शिंदे, पै.चैतन्य शेळके, पै.बाळा गंडाळे आदींनी हजेरी लावली.

# ओंकार संगीत निकेतनचे गायन वादन परीक्षेत यश



गायन वादन परीक्षांमध्ये यशस्वी झालेले ओंकार संगीत निकेतनचे विद्यार्थी.

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या सत्र एप्रिल-मे २०२५ मधील परीक्षांमध्ये ओंकार संगीत निकेतनच्या भिंगार, दरेवाडी, जैन धर्म स्थानक शाखांमधील विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे, गायन / हार्मोनियम विषयात प्रारंभिक : विराज लवांडे, गौरी घोलप, दिशा घोडके, श्लोक थिटे, प्रबुद्ध शिंदे, हुमीशा कोठारी, प्रणव मुनोत, अवनी गाडे.

प्रवेशिका प्रथम : राधिका जगताप, पलक गांधी, भक्ती गुंजाळ, आश्रीज्ञा कुसाळकर, प्रेम मजूरकर आदर्श मजुकर, साहीला कोकणे, श्रीराम खांदवे, स्टेफी केल, सिमरन मुनोत, रिद्धी मेहेर, रोशनी बोरा, साची गुंदेचा.

प्रवेशिका पूर्ण – अनुज दरवडे,स्नेहल धाडगे, शिवराज धाडगे, वैष्णवी कोल्हे, संस्कृती कोठुळे, सान्वी मुरूमकर, पायल राऊत, वैष्णवी चव्हाण, वैभवी चव्हाण, श्रद्धा शिंदे, ईश्वरी ननवरे, अक्षरा गुंदेचा.

मध्यमा प्रथम : वैष्णवी पालवे, रूपाली केदारे, दर्शन जावळे, सानिका औटे, गायत्री धनलगडे.

मध्यमा पूर्ण : पूर्वा लकारे, मोहीका भंडारे. विशारद पूर्ण – नेहा दरवडे. सर्व विद्यार्थी विशेष योग्यता / प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

तबला विषयात प्रारंभिक – मयंक कर्डिले, रोहन लोखंडे, विश्वजीत माने, सुहास कोकणे, कार्तिक म्हस्के.

प्रवेशिका प्रथम- आरुषी नन्नवरे, सुयश साठे.

प्रवेशिका पूर्ण – ईश्वर पेगड्याल, शिवम मराठी, आशिष घोलप, विराज सागडे.

मध्यमा पूर्ण –धनंजय गोहेर.

विशारद प्रथम- वैष्णवी कोल्हे, आदित्य बुधवंत. सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

यशस्वी विद्यार्थ्यांना ओंकार संगीत निकेतनच्या संचालिका सौ. संगीता देऊळगांवकर, ओंकार देऊळगांवकर, शेखर दरवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# कॅलिडोस्कोप

## कराचीत रामायण हिट!

पाकिस्तानसारख्या मुस्लिमबहुल देशात हिंदू धर्माची सर्वात पवित्र आणि प्रसिद्ध कथा 'रामायण' रंगमंचावर दाखवली जाते, याची तुम्ही कल्पना करू शकता का? तेही इतक्या प्रेमाने आणि आदराने की लोक टाळ्या वाजवत राहतात? पण कराचीमध्ये असेच घडले. पाकिस्तानातील कराची शहरातील एका 'थिएटर ग्रुप'ने हे मोठे आणि मार्मिक पाऊल उचलले आहे. 'मौज' असे या ग्रुपचे नाव असून या नाटकाचे दिग्दर्शन योगेश्वर करेरा यांनी केले होते.




ही कथा रंगमंचावर आणल्यास कुणाचा अपमान होईल, अशी भीती कधीच वाटली नाही, असे करेरा यांनी सांगितले. 'रामायणाने मला नेहमीच प्रेरणा दिली आहे. ही केवळ एका धर्माची कथा नाही, तर चांगुलपणाच्या विजयाची आणि प्रेमाच्या सामर्थ्याची कथा आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये कराचीतील दुसऱ्या मजल्यावर (टीटूएफ) हे नाटक पहिल्यांदा सादर करण्यात आले होते आणि आता जुलैमध्ये पुन्हा 'आर्ट कौन्सिल ऑफ पाकिस्तान'मध्ये हे नाटक मोठ्या प्रमाणावर सादर करण्यात आले. नाटकात जड असे काहीच नव्हते. तरीही प्रत्येक दृश्यात हृदयस्पर्शी खोली होती. साधेपणात त्याचे सौंदर्य दडलेले होते.


रंगमंचावर प्रकाशयोजना, लाईव्ह म्युझिक, रंगीबेरंगी वेशभूषा आणि अगदी 'एआय'चा वापर यामुळे प्रेक्षक रामायणाच्या युगात पोहोचल्यासारखे वातावरण निर्माण झाले. या नाटकातील सर्व पात्रांची निवड अत्यंत काळजीपूर्वक करण्यात आली होती. राणा काझमी यांनी सीतेची भूमिका साकारली. ती इतकी शांत, कणखर आणि भावूक दिसत होती, की सर्वजण तिच्याकडे पाहत होते. रामाची व्यक्तिरेखा अश्मल लालवानी यांनी साकारली. त्यांच्या गांभीर्याने या व्यक्तिरेखेत चैतन्य आणले. त्याचवेळी रावण संहन गाझी बनला. त्याचा राग, आवाज आणि शैली हीच रावणाकडून अपेक्षित होती. इतर कलाकारांमध्ये आमिर अली (राजा दशरथ), वकास अख्तर (लक्ष्मण), जिब्रान खान (हनुमान) आणि सना तोहा (राणी कैकेयी) यांचा समावेश आहे.

हल्ली तंत्रज्ञान सगळीकडे आहे. पण या नाटकात 'एआय'चा (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) वापर बहुधा पहिल्यांदाच पाकिस्तानात पाहायला मिळाला. झाडांची पाने वाऱ्यात थरथरायला लागली तेव्हा राजाचा राजवाडा एकदम खरा दिसू लागला आणि दृश्याबरोबर सेटही बदलू लागला. सारे वातावरण जादुई झाले. ते सर्व 'एआय'चा वापर करून तयार केले होते वास्तवात झाडे नाहीत, किल्ले नाहीत, पण ते अगदी खरे दिसते. राणा काझमी म्हणाले, 'तंत्रज्ञान असताना त्याचा योग्य वापर का केला जात नाही. प्रत्येक दृश्य जिवंत व्हावे अशी आमची इच्छा होती आणि 'एआय'ने आम्हाला मदत केली. नाटक संपताच संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. काही लोकांच्या डोळ्यात अश्रूही होते. पाकिस्तानातील रंगमंचावर त्यांनी रामायण इतक्या प्रेमाने पाहिले, यावर कुणाचाच विश्वास बसत नव्हता. कलेला कधी धर्म दिसत नाही, माणुसकी दिसत नाही, हे या क्षणातून सिद्ध होते.

## नातं पक्षी आणि माणसांचं

कर्नाटकमधल्या मांड्या जिल्ह्यातल्या कोक्केरबेल्लूर गावात अनोखे पाहुणे येतात आणि गावातले लोक या पाहुण्यांची सरबराई करण्यात मग्न होतात. थंडीच्या दिवसात या गावात स्थलांतरित पक्षी येतात आणि इथले लोक या पक्ष्यांची आपल्या मुलींप्रमाणे देखभाल करतात. या पक्ष्यांना मुली तर त्यांच्या पिलांना नातवंड मानून सेवा केली जाते. पेलिकन आणि पेंटेड स्टॉर्कसारखे स्थलांतरित पक्षी या ठिकाणी येतात. हे पक्षी माहेरपणासाठी आले आहेत असंच इथले लोक मानतात. पेलिकन प्रजातीचे पक्षी ऑक्टोबर महिन्यात या गावात दाखल होतात. इथेच हे पक्षी अंडी घालतात. अंड्यांमधून पिल्लं बाहेर येतात. ही पिल्लं एप्रिलपर्यंत उडायला शिकतात. मगच हे पक्षी इथून जातात. बाळंतपणासाठी आलेल्या या मुलींना इथले लोक खूप जपतात. पेंटेड स्टॉर्क जातीचे पक्षी जुलै महिन्यापर्यंत इथे राहतात. पक्षी आणि गावकऱ्यांचं हे नातं पिढ्यानपिढ्यांचं आहे. जवळपास २०० वर्षांपूर्वीपासून गावात ही परंपरा सुरू झाली. आजही इथे परंपरेचं पालन केलं जातं. गावकरी या पक्ष्यांच्या अस्तित्वाला शुभ मानतात. या पक्ष्यांच्या तसंच त्यांच्या पिल्लांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली जाते. झाडांवर बांधलेल्या घरट्यांमधून पक्ष्यांची पिल्लं जमिनीवर पडू नयेत यासाठी झाडांखाली जाळ्या बांधल्या जातात. गावकऱ्यांसोबत प्रशासनही हे काम करतं. हे पक्षी मासे खातात.. जवळच्या नदीवर जाऊन ते आपलं अन्न मिळवतात. गावकरी आणि या पक्ष्यांचं हे नातं अनोखंच म्हटलं पाहिजे.







## चिमुकला महापौर

या जगात कुठे काय घडेल याचा नेम नाही. आपल्या देशात ठराविक वयानंतर निवडणूक लढवता येते. अठरा वर्षं पूर्ण झाल्यानंतर मतदानाचा अधिकार मिळतो. पण एकदा अमेरिकेत अवघ्या सात महिन्यांचा मुलगा महापौरपदी विराजमान झाला होता. इथल्या व्हाईटहॉल शहरात चिमुकल्या विलियम चार्ली मॅकमिलनला मानद महापौरपद देण्यात आलं होतं. एवढ्या लहान मुलाला मानद महापौर पद देण्याची ही पहिलीच वेळ असावी. गंमत म्हणजे या मुलाने महापौरपदाची शपथही घेतली. ही शपथ त्याच्या आईवडिलांनी वाचली. चार्लीच्या शपथविधी सोहळ्याला १५० लोक उपस्थित होते. व्हाईटहॉल वॉलंटियर अग्निशमन विभागाच्या वार्षिक बीबीक्यू फंडरेझर कार्यक्रमाअंतर्गत महापौरपदासाठी बोली लावली जाते. त्या वर्षी चार्लीच्या नावे सर्वाधिक बोली लावण्यात आली होती. यानंतर त्याची महापौरपदी नियुक्ती करण्यात आली. आईवडील शपथ वाचत असताना चार्ली त्यांच्या मांडीवर बसला होता. या कार्यक्रमाचं आयोजन चार्लीच्या आईवडिलांनीच केलं होतं. या कार्यक्रमात देशभक्तीपर गाणीही म्हटली गेली. यावेळी चार्ली खूप आनंदी दिसत होता. या चिमुकल्या महापौराचं सर्वांनी अभिनंदनही केलं.

## लग्नातच घेतला सूड



मंडप सजवलेला आहे. वधू-वर स्टेजवर बसलेले आहेत आणि लग्नातील सर्वात महत्वाचा क्षण आला आहे, कुंकू लावण्याचा. पण कुंकू उचलताच वधूचा विचार बदलतो. ती त्याच्याकडे पाहते आणि म्हणते, कृपया कुंकू लावताना काळजी घे. ते माझ्या चेहऱ्यावर पडले तर काय होईल याचा विचार कर. वर थोडा वेळ घाबरतो. नंतर हसत हसत म्हणतो हो बाळा आणि अगदी हळूवारपणे कुंकू लावण्याचा प्रयत्न करतो. तो एक छोटीशी चूक करतो आणि वधूच्या गालावर थोडे कुंकू पडते. आतापर्यंत शांत बसलेली वधू पुढच्याच क्षणी रुद्रावतार धारण करते. एकही क्षण वाया न घालवता, ती वराच्या हातातून कुंकवाची पेटी हिसकावून घेते आणि जणू सूड घेत असल्याप्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर घासते. आतापर्यंत सात फेरे घेऊन सात जन्मांचे स्वप्न पाहणारा गरीब वर आता कुंकवाने माखलेल्या चेहऱ्याने शांत, असहाय्य आणि आश्चर्यचकित होऊन उभा असतो.



## नदीच्या पाण्यावर चालते महिला!


आजकाल 'सोशल मीडिया'वर काय दावा करण्यात येईल. काय दिसेल याचा काही नेम नाही. 'सोशल मीडिया'वर फॉलोअर्स वाढवण्यासाठी असे काही एडिटिंग करण्यात येते, की भले भले तोंडात बोट घालतात. अचानक बागेतील झोपाळे जोरजोरात हलतात. पांढरी साडी घातलेली स्त्री मध्यरात्री एकटीच फिरताना दिसते. स्मशानभूमीत लिंबू हवेत तरंगते, तर काही ठिकाणी हवेत स्त्री तरंगताना दिसते. 'सोशल मीडिया'वर कारनामे करणारे कमी नाहीत. असाच एक कारनामा एका पोस्टमध्ये दिसला. त्यात एक महिला नदीच्या पाण्यावर चालत असल्याचे दिसले. लोकांनी हा चमत्कार असल्याची आवई उठवली. लोकांनी त्या स्त्रीची पूजा सुरू केली. अनेकांनी तिला पाहताच हात जोडले. काहींनी पायावर लोटांगण घेतले. काहींना साष्टांग दंडवत घातला. पण जेव्हा खरा प्रकार समोर आला. तेव्हा त्यांचे चेहरे पाहण्यासारखे झाले होते.

मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये ही घटना घडली. येथील नर्मदा नदीच्या पाण्यावर एक वृद्ध महिला पाण्यावरून चालत जात असल्याचे दिसत होते. महिला नदीच्या पाण्यावर चालत जात असल्याच्या चमत्काराचा दावा करण्यात आला. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर अनेक लोकांनी नदीच्या काठावर महिलेला पाहण्यासाठी एकच गर्दी केली. ही चर्चा आसपासच्या गावातही पोहचली. तेव्हा अनेक लोक वाहने करून नदीकाठी धावली. त्यांच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. याठिकाणी महिलांची संख्या अधिक होती. काही महिलांनी तर पूजेचे साहित्य मागवले आणि दुरूनच पूजा करायला सुरुवात केली. काहींनी त्या महिलेचा जयजयकार सुरू केला. हा काय चमत्कार आहे हे लोकांच्या लक्षात येईना. अनेकांनी त्याचे फोटो काढले. व्हिडीओ शूट केला.

ती महिलाच थोड्या वेळाने इतकी गर्दी का जमली ते पाहण्यासाठी समोर आली. ती नदीच्या काठाकडे आली. नर्मदेचे पात्र विस्तीर्ण आहे. एका दूरच्या काठावरून लोक ती पाण्यावर चालत असल्याचे पाहत होते. ती थोड्यावेळाने त्या गर्दीकडे पाण्यातून मिळेल तशी वाट काढत पोहचली. ती जवळ येताच लोकांनी देवी माँ म्हणून एकच जयजयकार केला. मग महिलेने हा काही चमत्कार नसल्याचे सांगितले. पात्र विस्तर्ण असल्याने अनेकांना ती पाण्यावर चालत जात असल्याचे वाटले; पण त्या ठिकाणी पाणी अत्यंत कमी असल्याचे त्या महिलेने सांगितले. ऊन-सावलीच्या खेळामुळे ती पाण्यावर चालत असल्याचा भ्रम अनेकांना झाल्याचे ती महिला म्हणाली.

ही महिला नर्मदा परिक्रमा करत आहे. ती अखेरच्या टप्प्यात या परिसरात होती. ती कमी पाण्यातून जात असताना अनेकांना ती पाण्यावरून चालत जात असल्याचा भास झाला. या महिलेला काही औषधींची माहिती आहे, जी आजारावर आणि हाड मोडल्यावर प्रभावी ठरतात. तिला आयुर्वेदामधील काही चिकित्सा पद्धतीची माहिती असल्याची माहिती तिने दिली. तिने नर्मदा परिक्रमेत कोणत्या झाडाचा पाला कसा उपयोगात आणायचा याची माहिती दिली.

## हनिमूनच्या रात्रीच संशय




लग्न हे नातं विश्वासावर अधिक खुलतं. नववधू लग्न होऊन सासरी जाते तेव्हा ती फक्त एका व्यक्तीवर विश्वास ठेवते. पण तीच व्यक्ती विश्वासाला तडा देते तेव्हा... असाच काहीसा प्रकार एका जिल्ह्यात घडला आहे. हनिमूनच्या रात्री नवरीला चक्कर आली तर नवऱ्याने थेट तिला प्रेग्नेंसी टेस्ट किट दिली. हे बघून नववधू चांगलीच भडकली. एवढंच नाही तर तिने थेट माहेरी फोन करून हा प्रकार सांगितला. यानंतर नववधूच्या माहेरच्यांनी थेट सासर गाठलं.

एका तरुणाचं पारंपरिक पद्धतीने लग्न झालं. वरात घरी पोहोचायला संध्याकाळी झाली. दिवसभराचा शीण आणि लग्नाचा ताण यामुळे नववधूला चक्कर आली. हा सगळा प्रकार बघताच वर घाबरला. त्याने हा सगळा प्रकार आपल्या मित्रांना सांगितला. तेव्हा मित्रांनी मस्करीत म्हटलं की, ही तर सगळी गरोदर असण्याची लक्षणे आहेत. या गोंधळात वर रात्रीच गावाबाहेरच्या मेडिकलमध्ये गेला आणि प्रेग्नेन्सी टेस्टचं किट विकत घेऊन आला.

हनिमूनच्या दिवशी नवऱ्याने नववधूला किट दिलं आणि टेस्ट करायला सांगितलं. हा सगळा प्रकार बघून नववधू हैराण झाली आणि तिने थेट आपल्या वहिनीला फोन केला. आपला नवरा आपल्यावर संशय घेत असल्याचं सांगितलं. एवढंच नव्हे, तर या आधी तुझा कुणासोबत संबंध होता का? असंदेखील विचारलं. वहिणीने हा सगळा प्रकार खूप गांभीर्याने घेतला आणि कुटुंबाला याची माहिती दिली. काही वेळातच नववधूच्या माहेरच्या मंडळींनी भेट घेतली आणि सासरच्या लोकांना हा सगळा प्रकार सांगितला. मुलगी लग्न होऊन घरी येताच हा सगळा प्रकार घडल्यामुळे माहेरच्यांनी कुटुंबाला जाब विचारायला सुरुवात केली. हे सगळं प्रकरण इतकं वाढलं, की गावातील लोकांना यामध्ये हस्तक्षेप करावा लागला. पंचायत बोलावण्यात आली. सुरुवातीला खूप गोंधळ झाला. नववधू आपल्या मतावर ठाम राहिली. वराने स्पष्टीकरण देताना सांगितले, की असे वागण्यामागे कोणतीही चुकीची भावना नव्हती.

दोन्ही बाजूंनी पंचायतीसमोर आपली आपली बाजू मांडली. अखेर नवऱ्याने आपली चूक मान्य करून नववधु आणि जवळच्या मंडळींकडे माफी मागितली. पंचायतीत सांगितलं की, यापुढे अशा पद्धतीचा कोणताही गैरव्यवहार होणार नाही. तेव्हा त्याने सांगितलं की, त्याला मित्रांनी चुकीचा सल्ला दिला आणि त्यानेही तो विचार न करता मान्य केला.



## हॉटेल बर्फाचं

स्वीडनमध्ये एक अनोखं हॉटेल आहे. हे हॉटेल बर्फापासून तयार केलं जातं. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे हे हॉटेल कायमस्वरुपी नाही. ते हिवाळ्यात तयार केलं जातं आणि पाच महिन्यांनी वितळून जातं. बर्फाचं हे पाणी नदीत सामावून जातं. १९८९ मध्ये पहिल्यांदा ही संकल्पना लढवण्यात आली. यंगवे बर्गक्विस्ट यांच्या संकल्पनेतून हे जगावेगळं आईस हॉटेल तयार करण्यात आलं होतं. यंदा या हॉटेलला ३६ वर्षं पूर्ण होत आहेत. म्हणूनच यंगवे बर्गक्विस्ट यांनी पर्यटकांच्या, पाहुण्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. त्यांनी आगळ्यावेगळ्या खोल्या तयार करून घेतल्या आहेत. सोळा देशांमधल्या ३३ कलाकारांनी अवघ्या एक आठवड्यात या खोल्या तयार केल्या आहेत. हे हॉटेल आर्क्टिक वर्तुळापासून २०० किलोमीटर अंतरावरच्या टॉर्न नदीत तयार केलं जातं. हिवाळ्यात इथलं तापमान उणे १८ ते ४० अंश सेल्सियस इतकं खाली जातं. हॉटेल बर्फाच्या १००० खांबांवर उभं आहे. प्रत्येक खांबाचं वजन जवळपास दोन टन इतकं आहे. या हॉटेलमध्ये दरवर्षी जवळपास ७० हजार पर्यटक येतात. हॉटेलमध्ये बारा खोल्या आहेत. तसंच आईस बारही आहे. बर्फाच्या या हॉटेलमध्ये रहाणं हा भन्नाट अनुभव ठरू शकतो.

## सख्ख्या भावा-बहिणीचे लग्न?

थायलंड, समृद्ध संस्कृती, सुंदर मंदिरे आणि अद्वितीय परंपरांसाठी ओळखला जाणारा देश आहे. येथील एका परंपरेने संपूर्ण जगाचं लक्ष वेधले आहे. इथे जुळ्या भावा-बहिणींचे लग्न लावले जाते. हे ऐकायला कितीही विचित्र वाटत असले तरी, स्थानिक समुदायांसाठी ते तितकेच पवित्र आणि महत्त्वाचे आहे. या परंपरेमागे बौद्ध श्रद्धा आणि भूतकाळातील जीवनाच्या कथा आहेत, ज्यामुळे ती आणखी रंजक बनते.

थायलंडमधील काही समुदायांमध्ये विशेषतः समुत प्राकानसारख्या भागात असा विश्वास आहे, की जुळी मुले एकाच आईपासून जन्मलेले भाऊ आणि बहीण असतील तर ते मागील जन्मात प्रेमी होते. बौद्ध धर्माच्या सिद्धांतानुसार मागच्या जन्मात काही कार्य राहिलं असेल तर जुळ्या भावा - बहिणीचा जन्म होतो. या मुलांचं लग्न प्रतीकात्मक समारंभात केलं नाही तर त्यांचे जीवन अपयश, आजार किंवा अशांततेने भरलेलं असू शकते, असे मानले जात. म्हणूनच, जुळी मुले ६ ते ८ वर्षांची होताच आई - वडील एका भव्य समारंभात त्यांचे लग्न लावून देतात.

या अनोख्या लग्नात सामान्य थाई लग्नात होणाऱ्या सर्व पारंपारिक विधींचा समावेश आहे. या सोहळ्यात मुलाला नव्या नवऱ्याप्रमाणे सजवण्यात येतं. नवऱ्या मुलाला जवळपास पाच लाख रुपयांचे दागिने देण्याची रित आहे. तर मुलीला वधूचा पोशाख घातला जातो आणि समारंभात पारंपारिक नृत्य, संगीत आणि मेजवानी यांचा समावेश असतो. मुलांचे आई - वडीलच त्यांचे सासू - सासरे देखील होतात. मोठ्या थाटात भावा - बहिणीचं लग्न केलं जातं. याला सांस्कृतिकदृष्ट्या मोठं महत्त्व आहे. परंतु असं लग्न कायदेशीरदृष्ट्या वैध नाही. थायलंडच्या कौटुंबिक कायद्यानुसार, भावंडांमध्ये किंवा जवळच्या रक्ताच्या नात्यातील विवाह प्रतिबंधित आहे. हे लग्न केवळ एक प्रतिकात्मक विधी असतो. त्याचा उद्देश मुलांचं भविष्य आनंदी आणि समृद्ध करणं हे आहे. लग्न सोहळा पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून मुलं त्यांचं आयुष्य सामान्य मुलांप्रमाणे जगण्यास सुरुवात करतात. त्यानंतर लग्नाचं वय झाल्यानंतर आपल्या आवडत्या व्यक्तीसोबत नव्या आयुष्याची सुरुवात करतात. या परंपरेत हुंड्याला थाई भाषेत 'सिन सॉड' असं म्हणतात.





## अपघात रोखणारं स्मार्ट हेल्मेट

थंडीच्या दिवसात वातावरणात धुकं असतं. या धुक्यामुळे वाहनचालकांना समोरचं स्पष्ट दिसत नाही आणि अपघात होण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. म्हणूनच एक स्मार्ट हेल्मेट तयार करण्यात आलं आहे. हे हेल्मेट दुचाकी चालकांसाठी तयार करण्यात आलं असून ते घातल्यानंतर चालकांना सतत सूचना दिली जाईल. या हेल्मेटमध्ये अल्ट्रा सोनिक सेंसर्स बसवण्यात आले आहेत. या सेंसर्समुळे समोर एखादं वाहन किंवा वस्तू असल्यास चालकाला सूचना मिळेल. १४ मीटर अंतरावरूनच चालकाला सूचना दिली जाईल. हेल्मेटवरच्या एलसीडीवर अंतरही फ्लॅश होईल. आर्मी पब्लिक स्कूलच्या संकल्पसिंह भादौरियाने हे हेल्मेट तयार केलं असून याची किंमत फक्त एक हजार रूपये आहे. या हेल्मेटची प्रतिकृती एमईटी विद्यापीठातल्या स्काय आर्ट प्रदर्शनात सादर करण्यात आली होती. या हेल्मेटला ब्रिद ॲनलायझर सिस्टिमही जोडण्यात आली आहे. यामुळे मद्यपान करणाऱ्यांच्या शरीरातल्या अल्कोहोलचं प्रमाण मोजणंही शक्य होणार आहे. चालकाच्या शरीरात अल्कोहोलचं अधिक प्रमाण असल्यास हे हेल्मेट गाडीचं इंजिन बंद करून टाकेल. म्हणजे चालकाला गाडी चालवता येणार नाही आणि अपघात टळू शकेल.

